

## भाकरीच्या तत्त्वज्ञानाचा तटस्थ भाष्यकार...!

साहित्यकृती ही प्रतिभा आणि परिस्थितीचे अपत्य असते. प्रतिभा, परिस्थिती आणि प्रज्ञा एकजीव झाल्या म्हणजे अभिजात वांङमय कृती आकारास येते. अक्षर कलाकृतीचे आकलन, आस्वाद व मूल्यमापन, ही एक मोठीच कसरत असते. लेखनकृती व वाचक यांच्यातील संवाद सुकरतेने व्हावा म्हणून सहृदयी सत्यान्वेषी समीक्षक कलाकृतींमधील भावानुभूतीचा अर्थ आणि अन्वयार्थ तटस्थतेने व चिकित्सकतेने वाचकांना उलगडून सांगतो. नवनिर्मितीची अत्यंत गूढ प्रक्रिया सामान्य परिशीलन कर्त्यालाही संयमाने व निर्भयतेने समजावून देण्यात समीक्षाची भूमिका महत्त्वाची असते.

गुलामी, पारतंत्र्य आणि जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या धडपडीचा कलात्मक वेध घेणारे विश्वात्मक लेखक म्हणजे अण्णाभाऊ साठे. सुलतान, भीमा व भोंमक्या या अण्णाभाऊंच्या वाङ्मय विश्वातील अजरामर व्यक्तिरेखा आहेत. भाकरीसाठी केलेल्या संघर्षाचे तत्वज्ञान आणि त्या मागच्या प्रेरणेचे कळसूत्र! प्रसादिकतेने प्रो.डॉ. भगवान वाघमारे यांनी सुलतान, भीमा व भोंमक्याः भाकरीचे तत्वज्ञान या पुस्तिकेतून लीलया अभिव्यक्त केले आहे. 'भाकर' हे जीवन मूल्य असल्याचे मौलिक मत प्रो. डॉ. भगवान वाघमारे यांनी मांडले. स्वातंत्र्याचा सूर्योदय भीमा भोमक्या व सुलतानाच्या वस्तीत झाला नाही. ही मर्यादा विज्ञान विद्याशाखेचे व्यासंगी विचारवंत प्रो.डॉ. भगवान वाघमारे यांनी अधोरेखित केली आहे.

वाचन, चिंतनात सदैव व्यग्र असणारे प्रो. डॉ. भगवान वाघमारे चळवळीशी प्रमाणिक व विचारांशी एकनिष्ठ राहिले आहेत. सामाजिक,आर्थिक, सांस्कृतिक शोषणाबद्दल सतत संवेदनशीलतेने मत वैचित्र्याचा लेखन आदर करीत अर्थ निर्णयाप्रत ते पोहचतात. पटेल ते बोलणार आणि टिकेल ते लिहिणार! सम्यक समाज निर्मितीसाठी समर्पितभावाने व चिकित्सकतेने सर्जरी करणार, ही प्रो. डॉ. भगवान वाघमारे यांची मूळपिंड, प्रकृती आहे. अण्णाभाऊंच्या साहित्याचा पोत आणि एक पदराचा मार्मिकतेने परिचय प्रा.वाघमारे सरांनी करून दिला आहे.

सुलतान, भीमा व भोंमक्याः भाकरीचे तत्वज्ञान या भगवानरावांच्या पुनर्निर्मितीचे नम्र आणि प्रज्ञावंत वाचक स्वागत करतील. कला म्हणजे कल्पनेच्या ललितरम्य कारंज्या नसून माणसांच्या जगण्यातील धग,धैर्य आणि दृष्टीची सूचक अभिव्यक्ती असते. अण्णाभाऊंनी प्रत्यक्ष अनुभूतीची अवस्था करून सोडणारी लीळाचरित्रे मराठी वाङ्मय सृष्टीला दिली. प्रो. वाघमारे यांनी अण्णाभाऊंच्या अक्षर कलाकृतीतील जिद्द, जिगरबाज नि जाज्वल्य निष्ठेच्या निर्भिड व्यक्ती चित्रांच्या झुंजीचे प्रत्याकारक दर्शन प्रस्तुत पुस्तिकेतुन घडविले आहे.


विज्ञान विषयाचा विवेकी प्राध्यापक, प्रतिभावंत कवी, चिकित्सक संशोधक व विनम्र वक्तृत्व लाभलेले डॉ.वाघमारे अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे अभिजात भाष्यकार आहेत. अन्यायाविरुद्ध झुंजणाऱ्या माणसाने जगण्याकरिता संघर्ष करणाऱ्या नायकाच्या लढ्याचे केलेले अनुपम दर्शन रेखाटन नूतन अभ्यासकांना दिशादर्शक आहे.

सदरील अनन्यसाधारण शोधाचे मनःपूर्वक अभिनंदन!

**प्रो.राजकुमार मस्के**
मराठी विभाग प्रमुख
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर, जि. लातूर

Dayadhan Publishers Group
263, Anudaya, Akola Rod, Near Gram Panchayat Office,
Balsond, Hingoli Maharashtra State (India)
7276193979
www.dayadhanpublication.com

ISBN : 978-81-951061-8-9



# सुलतान - भीमा - भोमक्या:

# भाकरीचे तत्वज्ञान

**प्रा. डॉ. भगवान वाघमारे**

**निलंगा, जिल्हा लातूर.**

**माजी प्रदेशाध्यक्ष, लसाकम, महाराष्ट्र राज्य.**

**दयाधन पब्लिशर्स ग्रुप, भारत सरकारच्या MSME मंत्रालया अंतर्गत मान्यताप्राप्त.**

**नोंदणी क्रमांक MH-12-0001884**

# सुलतान - भीमा - भोमक्या : **भाकरीचे तत्वज्ञान**

© **प्रा. डॉ. भगवान वाघमारे**

**आवृत्ती** :- पहिली

**प्रकाशिका**
मस्के अनिता दयाराम
दयाधन पब्लिशर्स ग्रुप, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली.
महाराष्ट्र राज्य, ( भारत) 431513.
Mob. No. 7276193979 / 9604872233
**Email Id**: - dayadhanpublishersgroup@gmail.com
**Website:** - http://www.dayadhanpublication.com
**मुद्रक**
श्रेया प्रिंटर्स, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, (भारत) 431513.
प्रकाशन दिनांक 14/04/2021

(**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 130 व्या जयंती दिनी**)

**ISBN No. 978-81-951061-8-9**

किंमत 51/-

**टीप:-** प्रस्तुत ग्रंथातील लेखन व पुनर्मुद्रण यांचे सर्व हक्क प्रोफेसर भगवान वाघमारे यांच्याकडे राखीव आहेत. लेखन संभ्रमित अथवा सदोष झाल्यास / आढळल्यास यासाठी केवळ लेखकच जबाबदार असतील. ग्रंथातील भाषा, लेखन आणि आशय याविषयी प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

**न्यायाधिकरण:- जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली.**

## सविनय

## समर्पित.......!

जन्मो-जन्मी आमचे

आयुष्य फाटत आले

जीने शिऊन धड केले

ती मायालयातील

माझी माय

सोनामाय

हीस...!

# दोन शब्द....

**'फकिराचे तत्वज्ञान'** या छोट्या पुस्तिकेचे स्वागत झाल्यानंतर माझ्या दुसऱ्या **"सुलतान - भीमा – भोमक्या: भाकरीचे तत्वज्ञान"** या छोट्या पुस्तिकेचे प्रकाशन होत आहे याचा मला मनस्वी आनंद आहे. अण्णाभाऊंचे जीवनच हे मृत्यूकडून जीवनाकडे झेप घेणारा झंझावात आहे. या झंझावाताच्या कथा-कादंबऱ्यात विखुरलेले मानवी मूल्यांचे तत्त्वज्ञान या विषयाच्या अनुषंगाने छोट्या - छोट्या पुस्तिका निर्मितीचा माझा मानस आहे. त्यातीलच एक भाग म्हणून या दुसऱ्या पुस्तिकेच्या निर्मितीचे आपण स्वागतच कराल, हे निश्चित आहेचं कारण मी एक परिवर्तनवादी चळवळीतला कार्यकर्ता आहे. कार्यकर्त्यांना प्रेरणा देणे ही चळवळीची जाण असते. सुलतान - भीमा – भोमक्या या संदर्भीय तीन कथा वाचल्यानंतर मला माझ्या आयुष्यातील अनेक प्रसंगांची आठवण झाली. माझे जीवनच तसे संघर्षमय आहे. संघर्षा पासून दूर राहून शांत आणि प्रसन्न जीवनाचा आनंद घ्यावा हे माझ्यासाठी नियतीलाच कदाचित मान्य नसावे म्हणून मी सतत धडपडत – भटकत जगलो आहे. मी निस्वार्थी, सरळ आणि विवेकी, परिवर्तनवादी सामाजिक चळवळीतील जाणकार कार्यकर्ता म्हणून माझी ओळख आहेच. मी बेगडी, तकलादू आणि सुप्त इच्छाशक्ती बाळगणारा नाही. मनाला, विवेकाला जे पटले ते सातत्याने करण्याचा प्रयत्न करतो पण विवेकाला खटकले कि मात्र मन पेटते! संघर्ष टाळण्यासाठी मिळणारी मनःशांती आपल्या अस्तित्वाची, स्वातंत्र्याची व आत्मसन्मानाची किंमत मोजल्यावरच मिळणार असेल तर मात्र संघर्ष टाळण्याऐवजी संघर्षला भिडण्याची माझी वृत्ती आहे. हीच वृत्ती जोपासत गेल्या ४० वर्षापासून मी परिवर्तनवादी सामाजिक चळवळीत सतत कामात राहिलेलो आहे कारण 'भगवान वाघमारे' या नावाची निर्मितीच चळवळीतून झालेली आहे म्हणून मी स्वतःला परिवर्तनवादी चळवळीचे अपत्य समजतो. परिवर्तनवादी चळवळीतील एक विज्ञानवादी कार्यकर्ता म्हणून गेल्या ३२ वर्षांच्या कार्यकाळात दारिद्र्यात जगणाऱ्या अज्ञानी, वंचित समाजाच्या

उत्थानासाठी क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ अर्थात लसाकम या परिवर्तनवादी विचाराची चळवळ ही शोषण मुक्तीची पेरणी करणारी ठरली आहे, त्या चळवळीचा मी अविभाज्य भाग राहिलेलो आहे

सध्या देशात प्रतिक्रांतीचे वादळ निर्माण झालेले आहे. आपले मुलभूत सामाजिक हक्क मिळवणे आणि टिकवणे त्यासाठी संघर्ष करावा लागणे हे अटळ आणि स्वाभाविकच आहे. दलित - अस्पृश्य, आदिवासी आणि भटके हे एकविसाव्या शतकात अखेरचे गुलाम राहू नयेत म्हणून परिवर्तनवादी चळवळीचे मूलगामी परिवर्तनाचे उद्दिष्टे असतात. अगदी तेच प्रयोजन अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे होते.

सुलतान-भीमा-भोमक्या भाकरीसाठी स्पंदणाऱ्या समाजाचे प्रतिनिधी आहेत. भाकरीसाठी भटकण्याचा माझ्यासहित काही अंशी अनुभव आपल्याही पदरी असणार आहे. कारण आपण बहिष्कृतातील बहिष्कृत आहोत. मी तर, भाकरीसाठी असहाय्य झालेल्या सुलतान,भीमा व भोमक्याच्या जातकुळीशी नाते सांगणारा आहे. भाकर हे जीवन मूल्य आहे. भाकरीसाठी विद्यार्थी जीवनात काय? काय? करावे लागले हे येथे सांगणे शक्य नाही पण सुलतान,भीमा व भोमक्याच्या रिकाम्या आतड्याची अर्त किंकाळी भूतकाळातील आमच्याही रिकाम्या आतड्याशी ठाव घेतल्याचे आजही जाणवते. माणूस म्हणून एकमेंकाच्या आतड्यांची जाणीव आणि निष्ठा जपण्याची गरज आजही आहे म्हणूनच आण्णाभाऊंनी ती जपली आणि समाजाला जपण्याचेही चिंतनशील मार्गदर्शन केलेले आहे. रोजच्या जगण्यासाठी दिवस-रात्र कष्ट उपसणाऱ्या उपेक्षित समाजाचे आपण साक्षीदार आणि वारसदार म्हणून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वैज्ञानिक आणि समाजात मुलभूत बदल घडवून आणणाऱ्या या चिंतनावर निष्ठेने अधिक काम करण्याची नितांत गरज आहे नव्हे तर ही काळाची हाक आहे. तुम्ही जागे व्हा! वैचारिक व्हा!! एक व्हा!!! पुन्हा एकदा गुलामी पेशवाई पावलाने येते आहे म्हणून नव्या जाणिवेने नव्या उमेदीने उपेक्षित समाजाचे मुलभूत प्रश्न घेऊन उभे राहणे गरजेचे आहे. फक्त भाकरीसाठीच नाही, तर मानवी समूहाच्या मूलभूत

हक्कासाठी सुलतान - भीमा - भोमक्याची मानवी मूल्यांची लढाई आजही एकविसाव्या शतकात लढण्याचे या कथेच्या तत्त्वज्ञानातून प्रतिपादन होते.

माझ्या विद्यार्थीदशेत भाकरीची चिंता वाहणारे माझे चुलते स्मृतीशेष रानबाजी वाघमारे, स्मृतीशेष केरबाजी वाघमारे-गोगदरी, स्मृतीशेष मल्हाररावजी वाघमारे, स्मृतीशेष प्रा. डॉ. पी. एम. गायकवाड आणि श्रीमती गायकवाडबाई, प्रा. राजेश घोडजकर आणि घोडजकरबाई, स्मृतीशेष डी. बी. गायकवाड व श्रीमती आक्का कंधार, माझे मेव्हणे मानेजी आगलावे आणि बहिण कलुबाई आगलावे, विठ्ठल भंडारे, नांदेड, माझ्या विद्यार्थी दशेतील माझे मित्र बाबूराव बसवंते, प्रा. इस्माईल सय्यद, स्मृतीशेष व्ही. एन. कपाळे आणि श्रीमती राधा, स्मृतीशेष ॲडव्होकेट राम वाघमारे - श्रीमती ऊषा, किशन – संध्या बसवंते, सतीश कवडे, ॲडव्होकेट प्रदीप बाराहळीकर नांदेड, स्मृतीशेष दत्ता वाघमारे किरोडा, स्मृतीशेष श्रीरंग वाघमारे बाचोटी, यांच्या नावाचा उल्लेख म्हणजे त्यांनी केलेल्या उपकाराची आठवण हृदयात गोंदवल्याशिवाय हे दोन शब्द पूर्णत्वास जात नाहीत म्हणून त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो. माझ्या फकिराचे तत्वज्ञान या पुस्तिकेची प्रतिक्रिया देणारे प्रोफेसर मुकुंद राजपंखे, अंबाजोगाई, शिवा कांबळे, शंकर नामवाडे, नांदेड प्रोफेसर सुशील प्रकाश चीमोरे, डॉ. मारुती कसाब, रामभाऊ कांबळे, उदगीर, प्रोफेसर बी. एस. गायकवाड, डॉ. बी. आर. गायकवाड, निलंगा, क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघाचे संभाजी डाकरे, मोहनराव लोंढे, दादाराव काळे, एस. जी. दिवेकर, डी.आर. आंबटवाड, डी. एस. नंनदकर, बी. बी.गायकवाड, ॲडहोकेट डी. एन. धडेकर आणि सर्व आजी व माजी पदाधिकारी निलंगा. अण्णाभाऊंचे तत्त्वज्ञान या विषयाच्या निर्मितीत प्रोत्साहन देणारे प्राचार्य डॉ. माधवराव गादेकर, डॉ. व्यंकट कसबे, बालाजी साळुंके, उत्तम दोरवे, केशव शेकापुरकर, दयानंद कांबळे, अशोक तोगरे, मधुसूदन कांडलीकर दादा, लातूर. डॉ. दयाराम मस्के हिंगोली, क्रांतीवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ अर्थात "लसाकम" राज्याध्यक्ष प्रा. संजय गायकवाड, डॉ.दिगंबर नेटके, प्रोफेसर ऋषिकेश कांबळे, औरंगाबाद, लसाकम महासचिव गुणवंत काळे, लसाकम कोषाध्यक्ष डी.एम. तपासकर, नांदेड, प्राचार्य आनंद भंडारे, डॉ. सुरेंद्र शिंदे, प्रा.

रामकिशन संमुखराव, किनवट, डॉ. रमेश लांडगे, बीड, डॉ. बळी गायकवाड, मुंबई, प्रा. राहुल नरंगलकर, पुणे, लहुजी जाधव, धनराज सूर्यवंशी चाकूर, लसाकमचे राज्य, विभागीय, जिल्हा आणि तालुका कार्यकारणीतील सर्व पदाधिकारी इत्यादींच्या आग्रह आणि पाठपुराव्यामुळे ही पुस्तिका निर्माण करण्यास गती मिळाली हे विशद करताना मला मनस्वी आनंद होत आहे.

मराठी वाङ्मय आणि कलाकृतींचे विद्या व्यासंगी अभ्यासक प्रोफेसर राजकुमार मस्के यांनी त्यांच्या व्यस्तेतून जाणीवपूर्वक पुरेसा वेळ राखून ठेवत सुलतान- भीमा- भोंमक्याः भाकरीचे तत्वज्ञान या मस्तकाचा ठाव घेणाऱ्या पुस्तकाचे पाठराखण करणारे शब्दांकन अतिशय तटस्थ आणि कोणत्याही भावनिकतेच्या धाग्यांचा विचार न करता मांडले. या लेखन कलाकृती करिता मी राजकुमार मस्के यांच्या कायम ऋणात राहतो. यापुढे देखील साहित्य वर्तुळातील माझ्या लेखन कार्यकर्तृत्वाच्या परंपरेत त्यांचे योगदान अबाधित आणि वृद्धिंगत होत राहील या आशावादा सह त्यांचा नामोल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजतो.

सौ. अनिता दयाराम मस्के हिंगोली, यांनी त्यांच्या मालकीच्या दयाधन पब्लिशर्स ग्रुप या प्रकाशन संस्थेतून अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील तत्वज्ञानाचा एक भाग म्हणून सुलतान -भीमा - भोमक्या : भाकरीचे तत्वज्ञान ही छोटी पुस्तिका प्रकाशित करण्याचा पाठपुरावा करून आग्रह सोडलाच नाही. या दाम्पत्याने निरंतर संपर्क ठेवून माझ्याकडून लेखन कार्य पूर्ण करून घेतले त्यामुळे त्यांचा नामोल्लेख करणे मला गरजेचे वाटते.

लसाकम मराठवाडा विभागीय अध्यक्ष मा.अण्णासाहेब तोडे यांनी लॉकडाऊन मध्ये सुलतान ही कथा PDF च्या माध्यमातून संदर्भासह उपलब्ध करून देण्यामध्ये फार मोठी मदत केली त्यामुळे त्यांचे आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो. डॉ. मच्छिंद्र सकटे कराड, यांच्याशी या पुस्तिकेच्या संदर्भाने झालेली चर्चा मला महत्त्वाची वाटते म्हणून त्यांचे आभार मानणे मला क्रमप्राप्त ठरते. हे लेखन निर्दोष व्हावे यासाठी ज्यांनी वेळ देऊन जबाबदारी आणि खबरदारी घेतली डॉ. महेश मंगनाळे, हिंगोली, त्यांचा उल्लेख करणे अनिवार्य आहे. त्याच बरोबर सुनील वांजरवाडे निलंगा, यांनी या पुस्तिकेचे मुद्रण किमान

वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी जाणीवपूर्वक वेळ दिला त्यामुळे त्यांचाही नामोल्लेख करणे आवश्यक ठरतो. सुलतान - भीमा - भोमक्या : भाकरीचे तत्वज्ञान हे माझे चिंतन त्यातील विचार, संदर्भ, आशय आणि विषय कुणाला रुचतील, कुणाला पचतील हे मी कसे सांगू ? जे - जे तुम्हाला रुचलेले - पचलेले आहे ते - ते तुमचेच. जे नाही ते माझे या अपेक्षासह ज्यांनी ज्यांनी हे चिंतन लिहिण्यासाठी प्रेरणा दिली त्यांचे आणि माझ्या कुटुंबातील प्रा. श्याम वाघमारे, डॉ. उत्तम वाघमारे, प्रा.ज्योत्स्ना उत्तम वाघमारे प्रा. बालाजी बोटेवाड, प्रा. सविता बोटेवाड ज्यांचा नामोल्लेख केल्याशिवाय या लेखनकृतीस पूर्णत्व प्राप्त होत नाही. लसाकम या परिवर्तनवादी सामाजिक चळवळीच्या नशेत वावरणाऱ्या माझ्यासारख्या धडपड्याला व कुटुंबाची सर्वस्व जबाबदारी येतकिंचितही ढळू न देता सांभाळणारी माझी अर्धांगिनी सौ. गोदावरी वाघमारे तिच्यामुळेच मी चळवळीत जगू शकलो आणि उभा टाकू सुद्धा शकलो. हे प्राधान्याने नमूद करणे मी माझे कर्तव्य समजतो. त्याच सोबत माझा मुलगा कुमारसागर वाघ आणि सुनबाई सौ अश्विनी कुमारसागर वाघ यांच्यासह या लेखन कार्यात ऊर्जा निर्माण करणारे कुमारी वैष्णवी आणि कुमारी सायली या सर्व आप्त सदस्यासहित माझे सर्व विद्यार्थी आणि हितचिंतक यांचा उल्लेख करणे पसंत करतो.

मराठी साहित्याचा अभ्यासक, चळवळीतील कार्यकर्ता आणि संशोधन वृत्ती बाळगणारा विज्ञानाचा प्राध्यापक म्हणून सुलतान - भीमा - भोमक्या या कथेच्या माध्यमातून जे - जे माझ्या हृदयाला भिडलं ते - ते भाकरीचे तत्वज्ञान या पुस्तिकेत संदर्भासह मांडलेले आहे.

**प्रा. डॉ. भगवान वाघमारे**

**९४ २३० ७६ ९१५**

महाराष्ट्र महाविद्यालय.निलंगा, जिल्हा लातूर.

माजी प्रदेशाध्यक्ष, लसाकम, महाराष्ट्र राज्य.

# कथा जगण्याची व्यथा भाकरीची

प्रोफेसर भगवान वाघमारे सर यांनी यापूर्वीच 'फकिराचे तत्त्वज्ञान' हे तात्विक स्वरूपातील लेखन आणि अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील समग्र तत्वज्ञानाला संक्षिप्ताने फकिरा कादंबरीच्या आधारे निर्देशित करण्याचा संकल्पित प्रयत्न यशस्वी केलेला आहे. वाचकांच्या उदंड प्रतिसादानंतर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात आलेले आणि प्रत्यक्ष संबंधित असलेले भोमक्या - भीमा आणि सुलतान ही तीनही कथा नायके हाताची आणि पोटाची गाठभेट व्हावी याकरिता तहहयात प्रयत्न करीत राहिले परंतु येथील व्यवस्थेने यांचा भाकरीचा प्रश्न जो साधा, सोपा आणि सरळ होता तो क्लिस्ट आणि बिकट करून ठेवला. अण्णाभाऊ यांच्या साहित्यात आलेले सर्व कथानक, पात्र आणि चित्रण हे वास्तव तसेच शाश्वत सत्य आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी वंचित, उपेक्षित, शोषित, पीडित, श्रमिक आणि कष्टकरी वर्गाचे जे हाल होतात ते अण्णाभाउंनी स्वतः अनुभवलेले असल्याने अण्णाभाऊंना भाकर, चाकर, नोकर आणि कामगार या सर्वांचा स्वानुभव जवळून आहे, तो प्रत्येक विधानागणिक जाणवतो.

सुलतान ही कथा ज्याला स्वतःचे नाव अथवा ओळख काहीही नाही अशा न घडलेल्या अथवा न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा भोगणाऱ्या एका कैद्याची आहे. जेलमध्ये गेल्यानंतर भाकरीचा प्रश्न सुटतो या विदारक सत्याची ही कथा आहे. तो जगण्याचा जाणीवेने संघर्ष करण्याचा प्रयत्न करतो परंतु दुर्दैवाने त्याला त्यात यश मिळत नाही. त्याच्या पदरी पडणारे अपयश शोधण्याचा प्रयत्न तो कसोशीने करतो परंतु येथील जात - वर्ग आणि धर्म व्यवस्था त्याच्या भाकरीचा संघर्ष संपू देत नाही. सुलतान हा माणूस म्हणून हे या व्यवस्थेला मान्यच नाही. सुलतान सारखे भाकरीच्या शोधात अनेक नायक - नायिका अण्णाभाऊंच्या साहित्यविश्वात संघर्ष करताना दिसतात. कष्टाला

आणि भाकरीला धर्म, जात, वर्ण - वर्ग यांच्या भिंती आड येत नाहीत असे आपण राजरोसपणे म्हणतो परंतु सुलतान याला अपवाद आहे, हे आपल्याला ‘सुलतान एक चिंतन’ हे वाचल्या खेरीज उमजणार नाही.

स्मशानातील सोनं ही कथा तर अफलातून आहे. भाकरीसाठी भटकणाऱ्या लोकांचे जगणे कसे वेशीवर टांगले आहे हे या कथेच्या माध्यमातून भीमा या नायकाच्या कृतीद्वारे अण्णाभाऊंनी जगासमोर मांडले आहे. दैनंदिन जगण्याचा आणि जीवनाचा प्रश्न सोडवताना भीमा कधी लोकांच्या मरणाच्या प्रतीक्षेत सापडला हे त्यालाही कळले नाही. कालांतराने भीमा गरीब माणसाने मरुच नये, या मताचा होतो. या पाठीमागची त्याची साधी भूमिका मयत झालेल्या प्रेताच्या मुखात काही सोने ठेवले जाते, गरिबाच्या पदरी सोने नावाचा दागिना फारसा नसतो, सोने प्रेताच्या मुखात श्रीमंताच्या पदरी येते त्यामुळे श्रीमताने मरावे आणि त्या सोन्याच्या आधारे आपल्या स्वतःच्या कुटूंबाची गुजराण करावी ही जगण्याची कैफियत मांडणारी कथा मन सुन्न करते. या कथेविषयी प्रोफेसर भगवान वाघमारे सर यांनी मांडलेली तात्विक भूमिका आणि तत्त्वज्ञान हे अलौकिक आहे. याचा प्रत्यय स्मशानातील सोनं या कथेतील तत्वज्ञान वाचताना आपल्याला आल्याखेरीज राहत नाही.

भोमक्या ही कथा पोटाची भूक भीक मागण्यास प्रवृत्त करते आणि समाजातील कष्ट करणाऱ्या हातांना सुद्धा काम न मिळाल्यामुळे हीन पद्धतीचे जगणे पदरी घ्यावे लागते या वास्तवाचे भयंकर चित्रण करणारी ही कथा आहे. भूक माणसाला लाचार, मजबूर, हातबल आणि कोणतेही कामे करण्यास भाग पाडते. भुकेकंगाल माणूस काहीही काम करायला तयार होतो परंतु येथील अभिजन वर्ग बलदंड देहयष्टीच्या माणसाला काम देत नाही. त्याच्या घामाला दाम मिळत नाही. डोके गांगरून टाकणारे हे सत्य या कथेच्या तत्त्वज्ञानाधारे मांडताना एका लघुपटाची कथाच वाटावी इतके ओघवते आणि ओजस्वी शब्दांकन प्रोफेसर भगवान वाघमारे सर यांनी केलेले आहे. जो कोणताही माणूस अथवा वाचक तत्वज्ञान या शब्दापासून स्वतःला दूर ठेवत असेल तो वाचक तत्वज्ञानाच्या प्रेमात पडल्याशिवाय राहणार नाही

याची प्रचिती या पुस्तिकेच्या माध्यमातून होते. भाकरीसाठी जगणाऱ्या गरीब लोकांचे शब्दांकन थोडक्यात दोन ओळीत खालीलप्रमाणे सांगता येईल

**"काय बघता राव! आमच्या गरीबीच्या श्रीमंतीचा थाट आहे झकास**
**झोपायला धरती आणि पांघरायला आकाश"**

उघड्यावर जगणाऱ्या, पालावरच्या लोकांचं जगणं आणि जिनं अण्णाभाऊंनी मांडलं त्यावरचं हे समीक्षण विविध संदर्भासह आल्याने या पुस्तिकेची संदर्भ कोशात गणना झाल्याशिवाय राहत नाही. सर्व वाचक वर्ग याही पुस्तिकेचे मनस्वी स्वागत करतील या अशावादासह प्रोफेसर भगवान वाघमारे सरांच्या लेखन परंपरेला सदिच्छा आणि शुभेच्छा व्यक्त करते.

धन्यवाद !

**सौ. आनिता दयाराम मस्के**
दयाधन पब्लिशर्स ग्रुप, हिंगोली.

# सुलतान - भीमा - भोमक्या : भाकरीचे तत्वज्ञान

गेल्या हजारो वर्षांपासून गावगाड्या बाहेरचा देश अर्थात बहिष्कृत देश म्हणजे दलित - अस्पृश्य, आदिवासी, भटके, वंचित, उपेक्षित आणि सामान्य मानवी समूह होय. ज्या मानवी समूहाला येथील प्रस्थापित संस्कृतीने गाव वेश बंदिस्त केली. गाव वेशीच्या बाहेरील बंदिस्त मानवी समूह अर्थात बहिष्कृत. या बहिष्कृत मानवी समूहाला निसर्गाने निर्माण केलेला जमीनीचा तुकडाही मिळू दिला नाही. निसर्गाने निर्माण केलेले पाणीही सुखाने पिऊ दिले नाही. पृथ्वीतलावर त्यांच्या मालकी हक्काचे असे काहीच नाही तर त्यांच्या स्वतःच्या शरीराचेही ते मालक नाहीत. गावगाड्या बाहेरचा पशूपेक्षाही हीन तो गुलाम मानवी समुह आहे. अशा गुलाम केलेल्या भल्यामोठ्या मानव समूहाचे हे जग सर्वस्वाने नाकारलेल्या वंचित, उपेक्षितांचे आहे आणि अण्णाभाऊ त्या जगाचे नाते-गोते मांडणारे नि त्या जगाशी कायम निष्ठा जपणारे सत्यशोधकी नि सत्यवर्तनी संशोधक, विचारवंत आहेत.

अण्णाभाऊंचे साहित्य सत्याचा शोध घेणारे, समाजाला सत्यवर्तनाचे संदर्भ देणारे आणि सामाजिक समता प्रदान करण्यासाठी आग्रह धरणारे आहे. दिन – दलित, कष्टकरी, उपेक्षित माणसांची त्यांची नाळ अधिक घट्ट आणि अतूट असल्यामुळे उपेक्षित माणसांच्या जिवंत जगण्यावर ते अधिक प्रेम करतात आणि त्यांना अधिक जपतात. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणून वारणा खोऱ्यातील प्रा. चंद्रकुमार नलगे, महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक अण्णाभाऊला मुंबईत भेटाय जातात तेंव्हा त्यांचे निवेदन हे आत्मिक आणि चिंतनीय आहे. प्राध्यापक चंद्रकुमार नलगे म्हणतात, " अण्णाभाऊ, तुमचे मुंबईचे ठिकाण पाहिलं नव्हतं मी! तुमच्या नावाचा व साहित्याचा वकुब साऱ्या महाराष्ट्राला माहित आहे. तुमची शहाण्याची शान काही वेगळे असेल असे मला वाटले. त्या आशेने चिरागनगरकडे आलो. अण्णा, तुमच्या जवळ पोहोचल्यावर साऱ्या अशांना सुरूग लागला. तुमची झोपडपट्टी...... तुमची

जुनाट झोपडी पाहून माझ्या अंगावर काटा भरला. तुटलेली बाज, ओळकंबणारी वळणी, कोष्टीकानी भरलेले कोनाडे, सोबत करणारा गॉर्कीचा पुतळा, येथील ओंगळवाणी वस्ती, तेथेच व्यग्र चेहऱ्याने बसलेल्या तुम्हाला पाहून मी भारावून गेलो का ? कुणास ठाऊक मी उदास बनलो. अशा थोर माणसानं असं जीवन का जगावं? कशासाठी हे सोसावं? माझ्या अंतःकरणाला जखम झाली. मी न राहवून विचारले, " अण्णाभाऊ तुम्ही इथं ..... या बकाल वस्तीत का राहता....? का राहता...? तुम्ही, डोळे माझ्यावर रोखले परत मला विचारलं " हो का राहवं तुम्ही? हेच सारे विचारतात, सरकारच्या समाजकल्याण खात्याने मला राहायला सुंदर जागा दिली " तुम्ही इथचं थांबला ?" मग तिथं का राहत नाही? अण्णाभाऊंचे उत्तर.... माझी माणसं इथं राहतात. कुठं? या झोपडपट्टीत, इथं राहणारी सारी माणसे माझी आहेत.

या माणसांना सोडून गेलो तर माझी प्रतिभा, प्रतिमा माझ्याजवळ राहणार नाही. मी इथं माणसं पाहतो. इथं खरं जिवंत जीवन आहे. हे सोडून गेलो तर मीच जिवंत राहणार नाही... दिवस-रात्र मिळेल ते खाऊन कष्ट करणाऱ्या उपेक्षित माणसाबद्दलची ही अण्णाभाऊंची निष्ठा आहे. या बहिष्कृत जगाची नि अण्णाभाऊंची सामाजिक नाळ एक आहे. या जगात मिळेल ते कष्ट करून घाम गाळणाऱ्या लाखो माणसांचे वास्तव जगणे आण्णाभाऊने मानवी जिव्हाळयाने मांडले, भूक बळीने मरणारे, कुपोषणाने मरणारे, बेघर लाखो माणसे रोज जगाच्या पाठीवर मारतांना अण्णाभाऊने पाहिलेले आहेत म्हणूनच भाकरीसाठी विद्रोह करणाऱ्या माणसांचे भयंकर नि वास्तव जगणे अण्णाभाऊने सुलतान - भीमा - भोमक्या या कथेतून मांडलेले आहे.

# सुलतान एक चिंतन .

मार्क्स – फुले – आंबेडकरी विचाराचा भाष्यकार, दलित साहित्याचा जनक आणि विद्रोही साहित्याचा साहित्य सम्राट, लोकसाहित्यिक अण्णाभाऊ साठे यांच्या ‘गजाआड’ या कथासंग्रहातील मनाला आणि हृदयाला चटका लावणारी कथा म्हणजे सुलतान. भूंके कंगाल सुलतानची वास्तव जीवन कहाणी – आण्णाभाऊने जगासमोर मांडली आणि सुलतान सातासमुद्रापलिकडे पोहचला. टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी म्हणजेच भाकरीसाठी आणि जगण्यासाठी येथील प्रस्तापित समाज रचनेच्या (व्यवस्थे) विरोधात निकाराचा लढा देणारा वीस वर्षाचा तरुण. ज्याचे नाव फक्त सुलतान. बापाचे नाव माहित नाही, आईचे नावही माहीत नाही. गावाचा पत्ता नाही. वय फक्त वीस वर्ष आणि गुन्हा २०३ अंतर्गत अटक. अमरावती मध्यवर्ती जेलमध्ये अण्णाभाऊला भेटलेला सुलतान. सुलतानाच्या भाकरीसाठीचा अक्रोश आण्णाभाऊने अमरावती मध्यवृती जेल मध्ये उघडया डोंळयांनी पाहिला. तोच अनुभव अण्णाभाऊनी पचविला सुध्दा. विषमतेने निर्माण केलेल्या भूकेल्या मानवी समुहात भाकरीसाठी चो-या - मा-या करणारी, भिक मागणारी, मिळेल ते कसलेही कामे करणारी आणि स्वत:ला दिवसा ढवळया विकणारी अशी हजारो - लाखो माणसे अण्णाभाऊनी पाहिली. अनुभवली आणि संगत - सोबतही केली. त्याच अनुभवविश्वातून ‘सुलतान’ ही कथा निर्माण झाली. अण्णाभाऊ प्रत्यक्ष रशियाला जाण्यापूर्वीच अण्णाभाऊला रशिया मध्ये केंव्हाच नेऊन पोहोचविले तोच सुलतान.

सुलतान फेम अण्णाभाऊ ही उपाधीही ‘सुलतान’ या कथेच्या निमित्ताने अण्णाभाऊला सन्मानित झाली. सुलतान संतापून आणि आक्रोशाने म्हणतो, मी आज वीस वर्ष झाले. माझं पोट भरावं म्हणून मी जीवाचे रान केले आहे. मला पोटभर अन्न मिळाले पाहिजे नाही तर मी टक्कर देईन. काय वाटेल ते करीन ? म्हणत, अमरावती तुरुंगातील भिंतीच्या दगडावर आपले बोट रोखून

सुलतान गर्जत होता. अण्णाभाऊ सुलतानच्या बोलण्याकडे, वृत्तीकडे आणि कृतीकडे संशोधन वृत्तीने पाहात होते. चिंतन करीत होते. हा सुलतान कोण ? त्याच्या हिस्याच्या भाकरी कोणी चोरल्या ? सुलतानाचे तारूण्य आणि त्याचे जगणे कोणी हिरावून घेतले ? अशा अनेक प्रश्नांची मालिका अण्णाभाऊंच्या संवेदनाशील मनात निर्माण झाली. त्यातूनच सुलतान जगासमोर आला.

अमरावती मध्यवृती जेल मध्ये विविध सामाजिक दु:ख - वेदना सोबत घेवून जगणारे अनेक कैदी अण्णाभाऊला भेटले होते. त्या कैदयांच्या संदर्भाने अण्णाभाऊंनी कथा लिहिल्या आणि त्या 'गजाआड', या कथासंग्रहात गजाआडच्या कथा म्हणून प्रकाशित केल्या. त्यात सामान्य माणसाचे अज्ञान, दु:ख – दारिद्रय, वेदना आणि इथल्या विषम समाज रचनेच्या विरोधातील तीव्र टोकाचा नकार, प्रस्तापित व्यवस्थेला ठणकावून आण्णाभाऊंनी मांडला. सुलतान , भोमक्या, मला बॉम्ब दया, मास्तर आणि इतर शेकडो कथा लिहिल्या. या सर्व कथांनी आण्णाभाऊला जागतिक पातळीवरील सत्यशोधकी लोक लेखक म्हणून सन्मानाला पात्र ठरविले. नव्हे तर सन्मान मिळणून दिला. अण्णाभाऊ हे सामाजिक – आर्थिक आणि रोजच्याच जगण्यातल्या व्यावहारिक दु:ख - वेदना आपलेपणाने आणि माणूसपणाच्या कळवळयाने समजून घेणारे जागतिक कथाकार होते. म्हणूनही अण्णाभाऊंना प्रतिष्ठा प्राप्त झाली.

अमरावती जेलमध्ये अण्णाभाऊ कैदयांच्या समवेत होते त्याचे कारण असे की, अण्णाभाऊ साठे, गव्हाणकर आणि त्यांचे शाहिरी लोकनाटयाचे कलापथक ४० दिवसाचा अमरावती जिल्हयाचा दौरा संपवून परत मुंबईकडे जात होते. सर्व साहित्यिक - कलावंत चांदूर रेल्वे स्टेशनला रेल्वेची वाट पाहात थांबले होते. साम्यवादी विचाराचे कार्यकर्ते अण्णाभाऊ आणि त्यांच्या कलावंतांना निरोप देण्यासाठी आले होते. अचानक तिनशे इंग्रजी पोलीसांनी चांदुर रेल्वेस्टेशनाला वेढा दिला. काही क्षणात अण्णाभाऊ आणि त्यांच्या साथीदाराची धरपकड सुरू झाली. बंदुकधारी इंग्रजी पोलीसांनी कलावंतांवर झडप घातली. अण्णाभाऊ म्हणतात,माझ्यावर एकाच वेळी आठ पोलीसांनी

मुरकंड दिली. त्या सर्वांनी एकाच वेळीस माझ्या पॅन्टच्या खिश्यात हात कोंबले आणि माझी पॅन्ट फाडून चिंदया - चिंदया केली. कारण त्यांना पिस्तूल हवे होते. हे असे का होते ? हे अण्णाभाऊ साठेसह इतर कलावंतांनाही, कुणालाचं कळत नव्हते. आम्हा सर्वांना अटक झाली आणि कारण समजले. कातरदडी गावाचा दरोडा, दोन खून, दोन लाखाची लूट, हत्यार जमविणे आणि इंग्रजी सरकार उलथवून टाकण्याचा कट रचणे असे आरोप अण्णाभाऊ साठेसह इतर कलावंतांवर लावले होते. इंग्रजी पोलीसांनी विदर्भाच्या कम्यूनिष्ट पार्टीतील सर्वच पदाधिकारी कार्यकर्त्यांना कैद केले होते. फक्त एकटेच भुपेन्द्रनाथ मुखर्जी फरारी होते. ज्या अमरावती जेल मध्ये अण्णाभाऊंना ठेवले होते त्या जेलमध्ये देशभक्त, क्रांतीकारक, १९४२ च्या भारतीय स्वांतत्र्याच्या उठावातील क्रांतीकारक आणि आष्टी चिमूरचे देशभक्तही त्याच जेलमध्ये होते. नागपूरचे साया मगनलाल बागडी हे ८० वर्षांची शिक्षा भोगत होते. आशा अनेक क्रांतीकारकांना न केलेल्या गुन्हयात भांडवली, सरमंजामशाही आणि जातव्यवस्थेचे विरोधक म्हणून अटक केले होते. तेथेचं अण्णाभाऊला ठेवले होते. तेथेचं अण्णाभाऊला सुलतान, भोमक्या, किसन, शेरखान – मास्तर ---------------- इत्यादी भेटले होते.

खरे तर, भारतीय स्वातंत्र्याने आणि संविधानाने देशातल्या कुठल्याही उच्च नि मध्यमवर्गीयांसह उपेक्षित, दलित - अस्पृश्य आणि सामान्य मानवी समूहाला अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, सामाजिक न्याय आणि इतर आवश्यक सर्व मूलभूत गरजा स्वतंत्र भारताचा स्वतंत्र नागरिक म्हणून प्रदान करणे ही त्या-त्या शासनव्यवस्थेचे घटनादत्त कर्तव्य असते आणि ती जबाबदारी भारतीय संविधानाने त्या-त्या शासनव्यवस्थेकडे सोपवली आहे. असे असतानाही हजारो नव्हे तर लाखो माणसे भारतीय स्वातंत्र्यात भुकेने होरपळून निघत आहेत. भूक बळी ठरत आहेत. अशा भुकेलेल्या माणसांचे प्रतिनिधित्व अण्णाभाऊंची सुलतान ही कथा करते. सुलतानची एकच अपेक्षा पोटभर भाकर (अन्न) मिळाले पाहिजे. हा तर स्वंतत्र भारतातील नागरीकांचा संवैधानिक हक्कच आहे. ते मानवी समूहाला प्रदान करणे म्हणजे नैसर्गिक स्वातंत्र्यातून

सामाजिक स्वातंत्र्य स्थापित करणे होय. हे त्या-त्या राज्यव्यवस्थेची पूर्व अट असते पण वास्तवात तसे घडत नाही म्हणून अनेक गल्लीबोळात आणि गावांगावात भाकरीसाठी बंड करणारे, लढा देणारे लाखो सुलतान भारताच्या आणि या जगाच्या पाठीवर पावलो पावली भेटतात. काहींचा मूक आक्रोश मरणाकडे घेऊन जातो तर काहींचा संघर्षमय आक्रोश सामाजिक वेदना आणि संवेदना निर्माण करतो. त्याच वेदनेची नाळ संवेदनशील मनाने अण्णाभाऊंनी जगासमोर बुलंदपणे मांडली आहे.

सुलतानचे वास्तव जगणे जसेच्या तसे मांडले. माणसांचे दुःख आणि भूक ही जात, धर्म, पंथ, वर्ण, वर्ग आणि लिंग पाहून निर्माण होत नसते. खरेतर भुकेला आणि दुःखाला जात नसतेच. फक्त ती भूकचं माणसांच्या ठाई असते. अगदी तद्वतच सुलतानचे, सुलतानला गाव नाही, आपलं म्हणावं असं कोणीच नाही. फक्त न फक्त भाकरीसाठी व्याकूळ झालेला सर्वहरा सुलतान एक माणूस आहे. त्याच्या मानवी संवेदना इच्छा - अपेक्षा आणि भाव - भावना अण्णाभाऊंनी सहानुभूतीने आणि आत्मीयतेने मांडलेल्या आहेत. अण्णाभाऊंची सुलतान ही कथा माणसांच्या जगण्याचे वैचारिक संघर्ष मूल्य घेऊन निर्माण झालेली आहे. जगाच्या पाठीवरील सजीवाला जगण्यासाठी पोट नसते तर जगातील सजीवांची जीवन प्रक्रिया अर्थात परिसंस्था (Ecosystem) कदाचित निराळीच राहिली असती. भाकरीसाठी इथल्या समाज व्यस्थेविरोधात संघर्ष करावा लागला नसता पण निसर्गाने जगण्यासाठी पोट, पोटासाठी आवश्यक अन्न आणि अन्नातून ऊर्जा तसेच ऊर्जेतून विचार, मनन - चिंतन यासाठीच माणूस म्हणून जगण्याची धडपड करत असतो. पण दुर्दैवाने माणसात माणसांच्या मनाचा त्यांच्या इंद्रियाचा आणि जगण्या - व्यवहाराचा संघर्ष फक्त न फक्त भाकरी भोवती पृथ्वी सारखा फिरत राहतो. जर असेचं असेल तर मात्र बंड - संघर्ष आणि विद्रोह आपोआपच पेट घेत असतो. हेचं सुलतानाच्या बाबतीत घडले म्हणूनच हा विद्रोही आकान्त तो जेल मध्ये मांडतो.

आई-वडील, बहिण-भाऊ आणि जवळचे म्हणावे तसे कोणीच नातेवाईक नसणारा बेवारस  सुलतान खेड्यांमध्ये जगण्यासाठी लोकांचे गुरे राखतो. मिळेल ते खातो पण त्याला कधीच पोटाचं  समाधान होणारे पोटभर जेवण मिळाले नाही म्हणूनच तो भाकरीसाठी आक्रोश करतो. खेड्यात पोट भरत नाही म्हणून तो अमरावती सारखे शहर गाठतो. सुलतान अमरावती शहरात कामासाठी सतत भटकत असतो तरी त्याला काम मिळत नव्हते. रस्तो-रस्ती शहरातले दुकान निरखत असतो आणि कामाच्या शोधाबरोबर दुकानातील ते खाद्यपदार्थ पाहूनच पोट भरून घेण्याचा प्रयत्नही करतो पण त्याचे पोट  मात्र भरत नाही. तो वैतागतो, कामाच्या शोधात फिरत असताना मिठाईच्या दुकानासमोर जातो. तेथील वेगवेगळी गोड पदार्थ खाण्याची त्याची प्रंचड इच्छा होते. तेथे मला  काम मिळेल का? असा स्वतःलाच प्रश्न विचारतो आणि तोच उत्तर देतो इथे मला कशी नोकरी मिळणार! हा तर लठ्ठ  बनिया आहे. तो फक्त लुबाडणारा आहे.  इथल्या जातीय चौकटीत अडकलेला आणि अडकवलेला सुलतान म्हणतो, आपण तर मुसलमान मग मुसलमानाला तो नोकरी कसे देणार ? मग आपण कसे जगणार.?

एकदा सुलतानला पानपट्टीवर नोकरी मिळते. ग्राहकाचे खाण्याचे पान तयार करून देणे आणि त्या कामाचा मोबदला म्हणून रोज चार आणे मिळू लागले. त्याच चार आण्यात सुलतानचे खाणे - पिणे भागत नव्हते. त्या चार आण्यात सुलतानचे  पोट भरत नव्हते म्हणून तो संतापतो. या मतलबी जगासामोर तोकडा पडतो आणि एके दिवशी पानपट्टी मालकाला म्हणतो, मालक एक गोष्ट बोलू का? आसे म्हणत, पगार वाढवण्या संबंधात सुलतान मालकाला विनंती करतो पण पगार वाढवून दिली जात नाही. उलट नोकरीवरूनच काढले जाते. सुलतान तावातावाने म्हणतो, हा हिंदू आणि मी मुसलमान. हा माझी पगार कसे वाढवणार? असा विचार करत सुलतान इतर कामाच्या शोधात निघतो आणि ठरवतो आपण नोकरी करायची तर फक्त मुसलमानाच्याकडेच असा विचार करत -  करत तो फिरत असतो.  येथे भारतीय समाजात  रुजलेली जातीव्यवस्था, आपला माणूस म्हणून  आपल्याच

जातीच्या माणसाला जवळ करणारी प्रवृत्ती आणि इतरांना पशुपेक्षाही हिन लेखण्याची पारंपारिक जातीय पद्धती, खेड्यापाड्यासहित शहरांतही रुजलेली सुलतानला जाणवते. भारतीय जात वास्तव सुलतान कथेच्या माध्यमातून अण्णाभाऊंनी अधोरेखित केलेले आहे. सुलतान थेट एका मुसलमानाच्या हॉटेलवर जाऊन त्या मालकाला विचारतो, मला काम देणार का? तो मालक म्हणतो काय घेणार? तेंव्हा सुलतान नोकरी मिळण्याच्या आनंदात म्हणाला मला चार आणे आणि चहा - जेवण परवडणार, या अटीवर मालक सुलतानाला नोकरी देतो. सुलतान खुश होतो आणि नियमितपणे नोकरी करू लागतो.

अचानकपणे एके दिवशी हॉटेल मालक सुलतानला म्हणातो, "तू एक प्लेट बिर्याणी, एक प्लेट खिमा, भात आणि चहा हे एक वेळेस खातोस. तू तर माझे दिवाळे काढणार!" तेव्हा सुलतान नम्रपणे म्हणतो, "मालक मी पोटाला लागेल तेवढेच खातो." तुझ्या पोटाला एवढे जास्त लागते तेवढे बकासुरालाही लागत नाही. पुढे मालक म्हणतो, "मला म्हशी पेक्षा रेडंकू मोठ नाही पाहिजे" म्हणून सुलतानला नोकरीवरून काढले जाते. येथे भारतीय जात - वास्तवा बरोबरचं अर्थिक व्यवहाराचाही प्रश्न निर्माण होतो. भारतातील वर्ण - वर्ग वर्चस्वाच्या गुंता - गुंतीच्या प्रश्नात सुलतान अडकतो. असे सुलतानसारखे लाखो - माणसे भारतीय विषमतावादी समाजरचनेच्या नव्हे तर जागतिक पातळीवरही वर्ण - वर्ग वादाच्या पिळवणुकीचे बळी आहेत.

सुलतान या कथेच्या माध्यमातून जगातील वर्ण - वर्गवाद व द्वेष - सिध्द होतो. सुलतान पुन्हा एकदा बेरोजगार झाला. भाकरीसाठी रस्तोरस्ती भटकंती करू लागला आणि कष्ट करण्यावर निष्ठा ठेवून सुलतानने ठरवले. आता नोकरी पुरे. आता हमाली करायची, पाटिवर ओझे वाहून घाम आणि रक्त अटवून जगायचं, असे ठरवून तो स्टेशनवर जाऊ लागला. सुलतानच्या दुर्दैवाने तिथेही त्याला कुठलेच काम मिळत नाही. तो स्वतःवर संतापला. आपण भिक मागितली, लोकांची गुरे राखली, शेन काढले, मागुन कपडे घातले पण आता वाटेल ते काम करायला तयार असताना मात्र कोणी काम देत नाही. पोटात कणभर अन्न नाही. अंगावर अंगभर वस्त्र नाहीत. राहण्यासाठी जागा

नाही. नोकरी नाही. तसे  स्वतःचं काहीच नाही म्हणून सुलतान स्वतःवरच चिडला आणि चालू लागला. रस्त्यात एक पोलीस भेटला आणि विचारले कोण तू? मी सुलतान. कोण सुलतान? सुलतान ने सांगितले, मी हमाल सुलतान. तीन दिवसापासून कामासाठी सतत  भटकतो तरीही  मला एकही काम भेटत नाही. कोणी काम देत नाही. पोटात अन्नाचा कण नाही,मग मी काय करू? मला ताप आला आहे. मला भूक लागली आहे आणि माझ्या जवळ एकही पैसा नाही. तेंव्हा पोलिस म्हणतो, पैसे नाहीत तर काम कर पण कामच मिळत नाही आणि भाकरीही मिळत नाही. मग पोलिसांनी सांगितले, जेलमध्ये जा. तेंव्हा सुलतान म्हणतो, साहेब मला जेलमध्ये  घेऊन जा. जेल काय धर्मशाळा नाही? त्यासाठी चोरी करावी लागते. तेंव्हाचं जेलमध्ये जाता येते. अन्यथा जाता येत नाही .तेव्हा नकारात्मक सुरात  सुलतान म्हणाला, मी चोरी करणार नाही. मी मरून जाईल पण चोरी करणार नाही.

एक सर्वसामान्य माणूस पोटाची  आग शमविण्यासाठी सुद्धा चोरी करत नाही. चोरी करणं हा गुन्हा आहे ते सुलतान  जाणून होता म्हणूनच तो म्हणत होता. मी मरेल पण चोरी करणार नाही. सुलतान  विचार करू लागला. आपण कसे जगायचे? जगायची की मरायचे? जगायचे तर कसे? आणि मरायचे तर कसे? मरणं सोपे की जगणे सोपे?  अशा अनेक  प्रश्नांनी सुलतान वेडावून गेला. साला मरण सोपे असते म्हणून चालत होता. त्वेषाने म्हणत होता, हे जग माझे नाही. शोध आणि संशोधनाच्या या जगाला माझी गरज नाही. मी मरावं असंच या जगाला वाटते आहे असे म्हणत रागाने तो चालत होता. सुलतान, पोटात भूक घेऊन अंधाऱ्या रात्री चालत होता. त्याला वाटत होते. उद्या सकाळी सर्व दुकाने उघडतील. लोक आनंदाने चहा पितील, कोणी पाव खातील, कोणी जे जे त्यांची इच्छा आहे ते पूर्ण करतील. आपण मात्र उपाशी दारात उभे राहून त्यांची तोंडं पाहत राहू. ही सर्व माणसे आपापल्या कामावर रुजू होतील, मी मात्र असाच भटकत उपाशी तडफडत फिरत राहणार. सुलतान उद्विग्न होऊन  म्हणत होता.  नाही...नाही... आता बसं! मला ही बेकारी नको! हे जग माझं नाही. या जगाला माझी गरज नाही. मी मरावं असेच या जगाला वाटते आहे. असे म्हणत

सुलतान अमरावती बडनेरा मार्गावर वेगाने चालत होता आणि बडनेरा रेल्वे स्टेशनवर येणाऱ्या गाडीच्या समोर सुलतान रुळावर आडवा पडला. गाडी थांबली, गोंधळ उडाला. लोकं सुलतानला रुळावरून बाजूला काढत होते आणि तो ऐकत नव्हता. आक्रोश करत होता. साहेब, मला मरू द्या. ....... मला मरू द्या.

या गोंधळात आणि लोकांच्या गदारोळात सुलतानला पोलिसांनी अटक केली. अमरावतीच्या सेंट्रल जेलमध्ये टाकले पण दुर्दैवाने जेलमध्ये ही सुलतानला पोट भरून त्याची इच्छा पूर्ण होईल इतके जेवन मिळत नव्हते म्हणूनच सुलतानचा आक्रोश होत होता. त्याने जेल हादरून सोडली होती. सुलताननी जेलमधील भारतीय तिरंग्या झेंड्या समोरील एका खांबाला धडक घेतली होती. तो बेशुद्ध अवस्थेत आक्रोशाने म्हणत होता, माझं पोट भरावे म्हणून मी पुष्कळ प्रयत्न केला. मी माझा जीव द्यायला सुद्धा तयार झालो. हे लक्षात असू द्या. येथे जर मला पोटभर अन्न मिळालं नाही तर मी वाट्टेल ते करीन. आत्ता मी मरणार नाही. मग काय करील ते ओळखा? हे इथल्या प्रस्थापित शोषक समाजरचनेला सुलतानचे उघड अव्हान होते. मी मरणार नाही पण वाटेल ते करेन ते ओळखा ...... ही अखेरच्या बंड –विद्रोहाची चेतावणी दिली आणि इथल्या वर्ण - वर्ग वर्चस्ववादी समाजरचनेला जाहीर आव्हान देउन आपले तुरुंगाचे कार्ड फेकून दिले. जेलर भेदरला होता. सर्व तुरुंगातील कैदी बाहेर पडले. धावपळ, गोंधळ सुरू झाला. सुलतान ओरडत आपल्या पोटावर हाताची थाप मारत म्हणतो मी या पोटासाठी लढणार! मला पोटभर अन्न हवे. जेलर चकीत झाला. थरारला, घाबरला शेवटी सुलतानच्या कार्डवर लिहिले गेले. दोन भाकरी ज्यादा तेंव्हा सुलतानच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. सुलतान शातं झाला.

हे भाकरीसाठी (अन्नासाठी), हे जगण्यासाठीच आणि पोटासाठी. सुलतानने जगाबरोबर केलेले युद्ध नव्हे तर महायुद्धच. सुलतानच्या निमित्ताने अण्णाभाऊंनी दीन – दलित, भटके - शेतमजूर, कामगार आणि उपेक्षित उपाशी माणसांच्या भाकरीच्या मूल्यचे - तत्वज्ञान जात दांडग्या आणि धनदांडग्या

जगासमोर  मांडले. सुलतानने पोलिसाला स्पष्ट सांगितले. मी मरेल पण चोरी करणार नाही. कष्ट करून जगणारी माणसे स्वत: जगतात नि इतरांना जगवितात पण चोरी करीत  नाहीत. म्हणूनच  अण्णाभाऊ  म्हणतात, “मला सामान्य माणसे आवडतात. त्यांना विद्रुप करणे आवडत नाही कारण ते स्वत: जगतात आणि इतराना जगवितात. त्यांची श्रमशक्ती महान आहे.” जगण्याचे नि जगविण्याचे सुत्र सांगणारा सुत्रकार हा कष्टकरी सामान्य माणूसचं आहे. खरे तर सामान्य माणसांच्या जगणेपणामुळेचं जगाचे जगपण अबाधीत आहे. जगाची जडण - घडण ही कष्ट काम करणाऱ्या - घाम गाळणाऱ्या सामान्य माणसामुळेचं होते. म्हणूनं सौंदर्याने, ऐश्वर्याने नटलेल्या जगाचा शिल्पकार हा सामान्य माणूस आहे.

अण्णाभाऊने त्यांच्या अनुभूवविश्वातुन, स्वतंत्र विचारसक्त आणि सुक्ष्म संशोधन प्रवृतीच्या संशोधनातून जगाचा कर्ता-धर्ता हा सामान्य माणूस आहे हे सिध्द केले. मी चोरी करणार नाही. मी काम करूनच जगेन पण मला काम मिळत नाही. माणसाने कशासाठी चोरी करू नये. माणसाने का चोरी करू नये? यामागे सुलतानची माणूस म्हणून काय भूमिका असेल? मला वाटते ज्या वस्तू चोरल्या जाणार आहेत. मग ते पैसे असतील, दागिने असतील, कपडे असतील आणि काहीही असेल त्या - त्या वस्तूवर त्या - त्या मालकाची भाव-भावना, मन आणि इच्छा सामावलेली असते. मानवी मनाची आणि मानवी भावनेची चोरी करणे हे अण्णाभाऊंच्या सुलतानला शक्यच नव्हते कारण सुलतान मानवी मूल्य घेऊन जगणारा एक भुकेकंगाल, दरिद्री माणूस असला तरी तो नितीमान होता. पण चोर नव्हता. हे सत्य नाकारता येत नाही. उलटपक्षी हजारो वर्षापासून आमच्या देशातच नि समाजरचनेच्या कोषात वावरणारी वर्ण - वर्ग वर्चस्ववादी वंशावळ मात्र सर्वसामान्य कष्टकरी, दलित - अस्पृश्य माणासांच्या घामाची, कष्टाची, त्याग - सर्मपणाची - चोरी करूनच गंर्भश्रीमंत झाले आहेत आणि होत आहेत त्यांची संख्या आमच्या देशात कमी नाही. घामाचा एकही थेंब न गाळता आनंदात आणि सुखात लोळणारी जात - दांडगे नि धनदांडगे मात्र सूर्याला साक्ष ठेवून देशाला लुटतात. माणसाला लुबाडतात.

सर्व सामान्य कष्टकरी माणसांची पिळवणुक करून त्यांचे सर्वस्व संपवितात. हा उपेक्षित सामान्य माणासावर अन्याय आहे.

सामान्य कष्टकरी माणसांचा समाजाप्रति, देशाप्रती आणि माणसू म्हणून स्वत: प्रती प्रामाणिकपणा जर गुन्हा ठरत असेलं तर काय ? म्हणूनच वर्ण - वर्ग स्त्रीदास्याने बरबटलेल्या समाजरचनेला सुलतान जाहिर आव्हान करतो. मी काय करील ते ओळखा? ही अन्यायाविरोधात, विषम व्यवस्थेच्या विरोधातील प्रखर चिड आणि असंतोषाचा ऐल्गार आहे. काम करून जगण्याची इच्छा असतानाही सुलतानच्या हाताला काम मिळत नव्हते. म्हणूनच तो भुकेकंगाल भाकरीसाठी आक्रोश करीत होता. भाकरीसाठी आणि पोटासाठी तो काहीही करायला तयार होता. फक्त चोरी सोडून कारण सुलतानने पोटाची खळगी भरण्यासाठी कधीचं चोरी केली नाही. चोरी न करणे हा कष्टकरी सामान्य माणसाचा स्थायीभाव आहे म्हणून सुलतान म्हणत होता, मी चोरी करणार नाही. हा सुलतानचा प्रामाणिकपणा, चोरी, लबाडी आणि फसवणूक करणाऱ्या या जातीय आणि वर्गीय अन्यायग्रस्त जगाला अण्णाभाऊंचा सुलतान चोरी करू नये असे सुचवतो नव्हे तर हा आदर्श घालून देतो कारण चोरीच्या माध्यमातून लोकांच्या मनाची नि भावनांची लूट होत असते ती होऊ नये. हीच त्याची प्रामाणिक इच्छा असते. हा प्रामाणिकपणा माणसाने समाज जीवनामध्ये जपावा. या जगात कोणी भुकेला राहू नये. भाकरीसाठी चोरी करू नये आणि भुकेसाठी तुरुंगात जाण्याची आणि आक्रोश करण्याची गरज भासू नये. सर्व मानवी समूहाला अधिकार संपन्नता प्रदान झाली पाहिजे. माणूस म्हणून त्यांची हक्क, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, अरोग्य, शिक्षण आणि आत्मसन्मान त्या त्या वेळी त्या त्या माणसांना प्रदान झाला पाहिजे. जेणेकरून पुन्हा या जगात सुलतान निर्माण होणार नाही याची खबरदारी समाज सत्तेनी, अर्थसत्तेनी आणि राजसत्तेनी घेतली पाहिजे असे अण्णाभाऊ सांगतात.

सुलतान हा दिन - दलित - अस्पृश्य, आदिवासी आणि भटक्यांचा प्रतिनिधी आहे. तो प्रत्येक श्वासाबरोबर भाकरीचा शोध घेत भटकत असतो. पोटाची आग विझविण्यासाठी, भाकरीच्या शोधासाठी आयुष्यभर इथल्या

अन्यायी समाज रचनेच्या विरोधात बंड - विद्रोह करणारे लाखो नव्हे तर अंब्जावधी - माणसे आहेत. भाकरीच्या संशोधनात धडपडणारे उपेक्षित भूके कंगाल माणसांचे जग हे अण्णाभाऊंचे जग आहे. हे जग इथल्या नाही रे वर्गाचे आहे. हे जग तुमचे, आमचे कष्टकर-यांचे, आदिवासी भटक्यांचे जग आहे. त्या जगाचा चालता - बोलता प्रतिनिधी हा सुलतान आहे. म्हणून सुलतान म्हणतो हे अन्यायी जग माझे नाही. या जगाला माझी गरज नाही. मी मरावे असेच वाटते म्हणूनचं सुलतान हे विषमतेचे जग नाकारतो. माणसांच्या मुलभूत गरजा नसलेल्या मानवी समूहाचा सुलतान एक विचार आहे . एक भाकरीचे तत्वज्ञान आहे.

# स्मशानातील भीमा

दलित, ग्रामीण साहित्याचे भाष्यकार अण्णाभाऊ साठे म्हणतात, "एक लबाड सत्ता डोंगराएवढे सत्य दडवू शकेल परंतु तिला दारिद्र्य हे मुळीच दडवता येणार नाही, असे माझे मत आहे नि असा माझा दावा आहे. दारिद्र्य हे फार क्रूर असते नि नग्न असते". या अन्वयार्थाने ‘स्मशानातील सोनं’ कथेतील दारिद्र्यात जगणाऱ्या भिमाचे वास्तव जीवन हे किती भयंकर आहे, असेही जगणे जगा निराळेच आहे ही बाब मानवी मनाला न शिवणारी आणि समाजाला न शोभणारी आहे. भाकरीसाठी माणसे अशीही कृती करून आपल्या संसाराचा गाडा हाकतात. ही बाबच अनाकलनीय आहे. अशा जगण्याचा विचारही मानवी मनात निर्माण होत नाही. असे भयानक जगणे स्मशानातील सोनं कथेतील भीमा जगतो आहे. भाकर आणि पोट माणसाला कुठल्या स्तरावर पोहोचवते किंबहुना घेऊन जाते आणि जगण्यासाठी काय - काय करावे लागते. हा शोध नी संशोधनाचा विषय आहे.

सामान्य माणसांचे असेच विखुरलेले जीवन आहे. असेच लाजिरवाणे जगणे आहे. पोटासाठी भीमाचे जगणेच हा एक नवा शोध आहे. हा नवा शोध जगण्यातला आहे. असे जगणेही असते का? कधीच न पाहिलेले, कधीच न ऐकलेले इतकेच काय तर स्वप्नात नि कल्पनेत सुद्धा असे जगणे आले नाही पण वास्तवात मात्र भीमा भाकरीसाठी, पोटासाठी विचाराच्या पलीकडे जाऊन जगतो. हे नवीन जगणे आहे. हा जगण्याचा नवा सिद्धांत आहे असे मला वाटते.

वारणा खोऱ्यातील एका खेडे गावचा भीमा शरीरात हत्तीचे बळ असूनही पोट मात्र रिकामे आहे. गावात हाताला काम मिळत नाही. लेकरा बाळांचे पोट भरत नाही म्हणून पोट हातावर घेऊन जगण्यासाठी मुंबई ही

पैशाची, कामाची तिजोरी आहे ही भावना उराशी बाळगून भीमा मुंबईत येतो पण भीमाच्या दुर्दैवाने संपूर्ण मुंबई पालथी घालूनही भीमाला मुंबईत काम मिळत नाही. तो कामासाठी रस्तोरस्ती भटकतो. आपणाला काम मिळावे. आपण कामगार व्हावे. आपणाला पगार मिळावा बायकोला दागिने करावे, पुतळ्याची माळ करावी. असे माफक स्वप्न घेऊन भीमा मुंबईत कामासाठी भटकत असतो. शेवटी भीमा निराश होऊन भटकतो. मुंबईत सर्वस्व आहे पण काम आणि निवारा या जीवनावश्यक गोष्टी नाहीत म्हणून भीमाला मुंबईचा रागही येतो आणि भटकत - भटकत भीमा मुंबईच्या उपनगरात आल्यानंतर शेजारच्या डोंगरात खाणीचे कामही भीमाला मिळते.

अंगापिंडाने मजबूत, भारदस्त भीमा, लाथ घालेल तेथे पाणी काढण्याची हिम्मत असणारा, पैलवानासारखा धिप्पाड भीमा रेड्याचे बळ नव्हे तर हत्तीचे बळ बाळगून जगणारा भीमा डोंगर फोडीत होता. कष्टावर कायम निष्ठा ठेवून इमाने इतबारे कष्ट करीत होता. खाणीचा गुत्तेदारही भिमाच्या कामावर खुष होता आणि भीमा ही खुश होता कारण भीमाला नियमीत पगार मिळत होता. माणूस म्हणून त्याची माफक इच्छा पूर्ण होत होती.

भीमाचं कुंटुंब अगदी लहान. बायको आणि एकच लाडकी लेक नाबदा. भिमाच्या आनंदी संसारावर सहा महिन्यानंतर शोककळा पसरली. सहा महिन्यात ती खान बंद झाली परिणामी भीमा बेकार, बायको - लेक उपाशी.... उद्याच्या आणि रोजच्याच भाकरीची नि पोटाची चिंता. उद्याचे काय? आणि कसे? हाच प्रश्न भीमा स्वतःला विचारू लागला. दारिद्र्य, बेकारी आणि उपासमारी ही भयंकर असते हा भोगवटा सामान्य माणसं भोगत असतात आपणही भोगलेलं आसेलही! उपासमारी ही माणसाला जगू देत नाही नि मरूही देत नाही. अशा गुंतागुंतीच्या अवस्थेत भीमा आणि भिमाचा संसार अडकला. भीमा उद्याच्या रोजीरोटीच्या विवंचनेत असतानाच, भीमाची नजर स्मशानातील एका राखेच्या ढिगाऱ्यावर पडली. आजूबाजूला अस्ताव्यस्तपणे जळकी हाडे पडली होती. त्या जळक्या मानवी प्रेताकडे पाहून भीमा आधिक घाबरला, गंभीरही झाला आणि स्वतःलाच म्हणू लागला की, आपणही असेच मरू.

लाडकी लेक नाबदा रडत बसेल, बायको मलूल होईल. आपण मात्र काहीच करू शकणार नाही. ही आंतरिक जखम भीमाच्या खोलवर रुजत होती. इतक्यात राखेच्या ढिगाऱ्यावर काहीतरी चमकल्यासारखे दिसले. भीमाने पुढे जाऊन ते निरखून पाहिले. तेथे एक सोन्याची अंगठी होती. भीमाने चटकन उचलून आपली मूठ बांधली. भीमाला आनंद झाला. एवढे मोठे सोने ते ही मढ्याच्या राखेत.? भीमाला हे सर्व नवीन वाटलं आणि मढयाच्या राखेत सोने असते हा नवा शोध भीमाला लागला. जगण्याचा नवा मार्ग भिमाला सापडला. गरज ही शोधाची भूमी असते. भाकरीची गरज ही शोधाचीच नाही तर संशोधनाची व नव्या परिमाणाची भूमी असते हा सिद्धांत आहे.

भीमा पोटासाठी स्मशान प्रदेशातील सर्व मसनवटे रोजच धुंडाळू लागला. नद्या-नाल्यातील सर्व मसनवटे शोधू लागला, मानवी मढ्यांची राख तो चाळणीने चालू लागला. त्यातून मिळालेले सोने कुर्ल्याच्या बाजारात नेऊन विकू लागला. रोख रक्कम घेऊन, नाबदासाठी खजूर घेऊन येऊ लागला. रोजच काही ना काही सोन्याचे  दागिने मिळू लागले. भिमाचा स्मशान  प्रदेशात नवा उद्योग जोरात सुरु झाला. भीमा निर्भय होऊन राख चाळीत होता. नवे नवे मसनवटे आणि नवे नवे मढे शोधत प्रेताची राख चाळून त्यातून मिळेल ते सोनं शोधून भीमा जगत होता. भीमाला जगण्या-मरण्यातील अन्तर- भिन्नता समजत नव्हती. आपण कसे जगत आहोत?. माणूस म्हणून जगत आहोत का ? आपल्यावर असे जगणे कोणी लादले? यातील काहीच भीमाला कळत नव्हते. कसे का? असेना फक्त जगणे आहे. तेवढेच भीमाचे चालू होते. ज्या राखेत सोन आहे ती श्रीमंताच्या मढ्यांची राख आणि ज्या राखेत सोनं नाही ती गरीबांची असे रोजच्याच प्रात्यक्षिकातून भिमाने सिद्ध केले होते. मरावे तर श्रीमंताने आणि जगावे तर गरिबाने. गरीबाने तर मरुचं नये असा भीमाचा नियम झाला होता. मरते समयी जो तोंडामध्ये तोळाभर सोनू घेऊन मारतो तोच खरा भाग्यवान आहे गरीब, असाह्य, अवमानित पामराला जगण्याचा नि मरण्याचा मुळीच अधिकार नाही असे भीमाचे मत झाले होते नव्हे तर तो भिमाचा निष्कर्षही होता. भीमा बेकारीने व्याकुळ झाला होता. दिवसा मसनवटे शोधत होता आणि रात्री

ती मढे उकरून काढीत होता. प्रेताला काखेत घेऊन सर्वत्र चाचपत होता. मढे काखेत घेऊन चाचपणे हे किती भयानक, भितीदायक आणि भयंकर आहे. हे ऐकवतही नाही आणि पाहावतही नाही पण भिमाचा रोजचाच खेळ होता नव्हे तर रोजचीच रोजी-रोटी होती म्हणूनच  माणसांचे मढे हीच भिमाच्या जगण्याचे एकमेव साधन बनले होते. जगण्यासाठी भीमासमोर दुसरा पर्यायच नव्हता कारण त्याच्या हाताला कुठेच काम मिळत नव्हते. पोट उपाशी बसू देत नव्हते, बायको आणि लेकीला जगविण्यासाठी भीमाला मढ्याशी झुंज द्यावी लागत होती. हे मात्र अफलातून होते.

भिमाच्या रोजच्याच उद्योगाने स्मशानातील मढे बाहेर पडत होते. मढे कोणीतरी उकरून काढत असेल हा संशय बाळगून लोक भयभीत झाले होते. पोलीस खात्याकडे ही खबर पोहोचली होती. भीमाकडे संकट चालून येत होते मात्र भीमाला कळत नव्हते. तो निर्भय आणि गंभीर होता. त्याचा रोजचा रात्रीचा उद्योगही सुरू होता कारण पोट महत्त्वाचे होते.भाकर महत्त्वाची होती.पोट आणि भाकर भीमाला स्वस्थ बसू देत नव्हती कारण कसे का? असेना जगणे होते. एकदा भीमाची बायको, भीमाला म्हणते, " मला वाटते हे काम नको  आम्हाला, कुठेतरी दुसरं काम करा. मढे, मढ्यांची राख, ते सोनं, हे संसार, हे सारं विपरीतच आहे. लोकं नावं ठेवतात. ही सामाजिक भीती भिमाच्या बायकोच्या हृदयात निर्माण झाली होती. आपण माणूस म्हणून आपणाला कोणी नाव ठेवू नये? ही माणूसपणाची प्रांजळ भावना भिमाच्या बायकोनी बोलून दाखवली. नाव ठेवणे म्हणजे इज्जत, अब्रूशी संबंधित असते. म्हणून कोणी नाव ठेवता कामा नये म्हणून भीमाची बायको झुरत  होती. मला भीती वाटते, भुतासारखे मसणवट्यात हिंडणे चांगले नाही म्हणून म्हणते, असे भीमाच्या बायकोने बोलून दाखवले. तेंव्हा भीमा म्हणतो, मसणवट्यात भूत असतात असे तुला कोणी सांगितलं? अगं ही मुंबईचं एक भुताचा बाजार आहे. खरी भुतं घरात राहतात आणि मेलेली त्या मसणवट्यात कुजतात. भुताची पैदास गावात होते. रानात नाही. हा भुताचा नवा वैज्ञानिक सिद्धान्त भीमा बायकोला सांगतो.

खरे तर, या जगात भूत ही संकल्पनाच नाही ती तर एक आंधळी श्रद्धा आहे. समाजात पसरविण्यात आलेली एक पारंपरिक भीती आहे. स्मशानात भुते नसतातच. फक्त प्रेताचे सांगाडे असतात. खरे भीतीदायक भुते हे समाजात वावरतात. गोरगरीब माणसांचं जीवन, त्यांचे जगणे हराम करतात, ते समाजातील भूतं. धन वर्चस्व, जात वर्चस्व आणि पुरुषप्रधान वर्चस्वाच्या नावाखाली येथील अज्ञानी कष्टकरी मानवी समूहावर अन्याय करणारे हे शोषक खऱ्या अर्थाने समाजातील भुते आहेत. भूतं रानात नसतात. ते गावात असतात. हा भीमाचा दावा खरंच विज्ञानवादी आहे, असे मला वाटते. आपणाला हे काम नको या बायकोच्या बोलण्यावर भीमा चिडतो आणि म्हणतो, मी काहीही करीन त्यात काय जातं? माझी चूल बंद झाल्यावर कोण पेटवणार आहे का? हा भिमाच्या समोरचा गंभीर आणि न सुटणारा प्रश्न, चूल आणि रोजची रोटी हाच होता. कोण काय म्हणेल याची तमा न बाळगता चूल बंद झाली नाही पाहिजे हाच एकमेव भिमाचा सवाल होता. हा सवाल फक्त न फक्त भिमाचाच नाही तर या पृथ्वीतलावर जगणाऱ्या भुकेने स्पंदणाऱ्या लाखो वस्त्यांचा आहे आणि स्पंदणाऱ्या काळजाचाही आहे.

या जगात अनेकांच्या चुली बंद आहेत म्हणून जगण्यासाठी वाट्टेल ते करून सामान्य - उपेक्षित माणसं जगतात. माझी चूल बंद झाल्यावर कोण पेटवणार? हा भिमाचा जाहीर सवाल सामाजिक संदर्भ घेऊन निर्माण झाला आहे. हा वैयक्तिक नाही तर भारतीय समाजातील भुक्या संसाराशी नाते सांगणारा आहे. इतकेच नव्हे तर तर भूक्या संसाराची दारुणता आणि रिकामी दुरडी जगाच्या वेशीवर आक्रोश करते आहे. चूल बंद झाल्यावर कोण पेटवणार....? हा एकच प्रश्न भिमाचा होता म्हणून भिमा निर्भय आणि गंभीर होता. त्याच्यावर संकट चालून येत असलेले भीमाला भाकरी पुढे आणि पोटा पुढे उमजत नव्हते. भीमाचा रोजचाच उद्योग चालूच होता. ही दारिद्र्याची सामाजिक धग होती.

भीमाच्या उद्योगाचे भांडवल हे रात्र, अंधार, स्मशान - मढे , हातात पोत्याची खोळ, कंबर बांधलेली आणि काखेत एक तीक्ष्ण टोकाची आणिदार पहार हे आपले भांडवल घेऊन भीमा अंधारात निघाला होता. तो निर्भय होता. त्याला कसलीही भीती वाटत नव्हती. उद्या सकाळी बायकोसाठी एक लुगडं, एक परकर, पोलका, खजूर एवढाच विचार तो करीत होता या पलीकडे भीमाला काहीच उमजत नव्हते . भीमानी स्मशान गाठलं. मध्यरात्र झालेली आकाशात ढगांनी गर्दी केली आणि अंधार अधिकचं काळा झाला. याच संधीचा फायदा घेऊन या टोकापासून त्या टोकापर्यंत भीमाने संपूर्ण स्मशान चाळले. वातावरण अधिक भयभीत झाले होते. त्याला आज नविन गारीचा शोध घ्यायचा होता. अशातच कोल्हयांनी धुमाकूळ घातला. एकंदरीत १५ कोल्हे ती नवीन गार सर्व बाजूंनी उकरीत होते आणि भीमाही तीच गार ऊकरण्याचे काम करीत होता.

नवीन गार उकरण्याच्या स्पर्धेत भिमा आणि कोल्हे यांच्यात लढाई सुरू झाली. कोल्हे भीमाचे लचके तोडत होते तरीही भीमाला मढयाच्या अंगावरील सोने काढायचे होते. त्यासाठी ती गार उकरणे भीमाला गरजेचे होते म्हणून भीमा कोल्हयाबरोबर निकाराची झुंज देत होता. उद्याच्या भाकरीसाठी पशु आणि मानव यांच्यात माणसांचा मृतदेह काबीज करण्यासाठी जणू युद्धाचेच रन पेटले होते असे अण्णाभाऊ म्हणतात. भीमाने त्या गारीतील ते प्रेत एकदाचे उकरून काढले. भीमा गारीत उतरला. कोल्हयांचा भीमावरचा हल्ला चालूच होता. कोल्ह्यांच्या हाणामारीत भीमा जखमी होऊनही, भीमाने त्या प्रेताच्या काखेत हात घालून ते प्रेत उभं केले. प्रेताच्या शरीराला सर्वत्र चाचपुन त्याने काही सोने ओढून, तोडून आणि ओरबडून काढले. भीमाने पहारीने प्रेताचे तोंड उघडले आणि तोंडात बोटे घालून सगळीकडेच चाचपुन काही सोने मिळविले. त्याच दरम्यान कोल्हयांनी कोल्हेकुई केली. स्मशान या शांत परिसरातील शांतता भंग पावुन कोल्हयांचा आक्रोश झाला. त्या कोल्ह्याच्या आवाजाने गावातील कुत्रे जागी झाले आणि माणसेही जागे होऊन

अरे! चला कोल्हयांनी प्रेत खाल्ले, असा आवाज घुमला. कंदील लावून गावाकडील माणसे स्मशानाकडे येत होती.

भीमावर प्रचंड मोठे संकट येत होते. भीमा गांगरून गेला होता, भयभीत होऊन भांबावलेल्या अवस्थेत आपण पकडले जाऊ नये, आपण पोलिसांच्या हवाली होऊ नये या भीतीने प्रेताच्या तोंडातून अगोदर हाताची बोटे काढण्याऐवजी त्याने पहार काढली परिणामी खटकन त्याची दोन्ही बोटे प्रेताच्या दातात अडकित्यातील सुपारी सारखे अडकले. भिमाच्या अंगात एक कळ निर्माण झाली. भीमा बोटे काढण्यासाठी प्रेताला हिसके देत होता परिणामी बोटे अधिकच घट्ट आडकत होती. गावाकडून स्मशानकडे माणसे येत असल्याचे भीमाला जाणवले भीमा अधिकच घाबरला आणि चिडला. त्याने प्रेताच्या टाळूवर पहार जोराने मारली आणि भीमाची बोटे अधिकच आडकली प्रेताचे दात भिमाच्या बोटात आत खोलवर रुतले आणि शेवटी भीमाने प्रेताच्या जबड्यात पहार टाकून हळूच आपली बोटे काढून घेतली. बोटे पूर्णतः तुटले होते. तशीच ती मूठ आणि अंगात संचारलेली कळ घेऊन भीमाने पळ काढला. दुसऱ्या दिवशी डॉक्टरनी भिमाची बोटे कापून काढली. तो हाताने अपंग झाला आणि त्याच दिवशी खाणीचे काम पुन्हा सुरू झाल्याची बातमी आली. हे ऐकून हत्तीच बळ घेऊन जगणारा भीमा लहान लेकरासारखा रडू लागला कारण डोंगर फोडणारी बोटे स्मशानातील सोन्यासाठी भीमाने कायमचे गमावले होते. त्या हाताने पुन्हा कष्ट उपसणे हे शक्य नव्हते म्हणून भीमा रडत होता.

संसाराची घडी न घडी विस्कटली जात होती. त्याच आगीत भीमा होरपळत होता. जगण्यासाठी माणसांना काय? काय? करावे लागते हा मूलभूत प्रश्न भीमाने या सुसंस्कृत जगाला विचारलेला आहे. या जगात जगण्यासाठी स्वतःचे रक्त विकून जगावे लागते, चोऱ्या, मारामाऱ्या, लुबाडणे, फसवणे,

गुलामी पत्करावी लागते, वेठबिगरी होऊन जगावे लागते. हे ही ऐकले आणि वाचले त्याही पुढे जाता स्त्री-पुरुषांना स्वतःचं शरीर विकून पोट भरावे लागते म्हणूनच अण्णाभाऊ म्हणाले होते,

फोरस रोड तीन बत्ती

गोलपिठा नाक्यावरती

कित्येक शरीर विकून पोट भरती.

भाकरीसाठी स्मशानातील भीमा होणे प्रेताच्या गारी उकरून प्रेताच्या तोंडातील सोने काढणे आणि आपलं पोट भरणे हे जगणेच मुळात आश्चर्यकारक आणि भयंकर आहे. या जगण्यातील मानवी मूल्य कसे शोधावे हा संशोधन क्षेत्रातील सर्वात मोठा जटिल आणि आव्हानात्मक प्रश्न अण्णाभाऊंच्या भीमाने निर्माण केलेला आहे. आम्ही माणूस म्हणून या जगण्याकडे २१ व्या शतकात कशा पद्धतीने पाहतो. हा माणसासाठी न सुटणारा प्रश्न आहे. भाकरीसाठी किती बेबंद, असहाय्य आणि गरज पडेल तर हैवान व्हावं लागतं हे खुशीने,आनंदाने भीमाने स्वीकारलेले  नव्हते, तर परिस्थितीने भीमावर लादलेला जगण्याचा नवा लढा होता. इतकेच नव्हे तर,हे भाकरीचे युद्ध होते. या सारगर्भीत आशय आणि विषयाची मांडणी करण्याचा अथवा संशोधनाला तडीस घेऊन जाण्याचे आव्हानात्मक कार्य देखील अण्णाभाऊ साठे यांच्या लेखन परंपरेने भीमा सारख्या नायकांच्या माध्यमातून निर्माण करून संशोधका समोर देखील तात्विक आव्हान निर्माण केले आहे.

# भोंमक्या : एक आकलन

सामाजिक बांधिलकीची निष्ठा जपणारे अण्णाभाऊ, हे मार्क्स गॉर्की मानणारे, ईश्वर न मनणारे, बुध्दीप्रमाण्यावाद मानणारे, शिवाजी- फुले - बाबासाहेब मानणारे, गुलामी न मानणारे अण्णाभाऊ. समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधूता आणि माणूस म्हणून माणसांच्या महानतेची जाणीव असणारे सत्यशोधकी अण्णाभाऊ साठे होते. निष्ठा नि परिवर्तनाचा संस्कार पेरणारे ते एक संस्कारच होते.

या अन्वर्थायाने सत्यशोधकी आणि सत्यवर्तनी विचारवंत अण्णाभाऊ साठे यांनी १९४९ साली कथा लेखनाला सुरुवात केली. त्या अगोदर त्यांनी अनेक क्रांतिकारी पोवाडे, क्रांती गिते, लोकनाट्य आणि शाहिरी अशा जीवनवादी कला प्रकारातून वर्चस्ववादी, सरंजामशाही, भांडवली आणि जातीय समाजरचनेच्या विरोधात परिर्वतवादी विचार, वरील संदर्भाने मानवमुक्तीची विचारधारा मांडली. १९३१ ते १९४२ या कालखंडात अण्णाभाऊ साठे मुंबईत असताना, मुंबई ही चळवळीची आणि क्रांतीची केंद्र बनलेली होती. कामगार चळवळी, आंबेडकरी चळवळ, चलेजावच्या आणि स्वातंत्र्याच्या चळवळींनी देशात तसेच आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत जोर धरला होता. त्याच सोबत दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवरील विविध वैचारिक विचारांच्या चळवळीची घुसळण मुंबईत सातत्याने होत होती. त्या चळवळीशी अण्णाभाऊंचा प्रत्यक्ष सहवास आणि विचारांची देवाण-घेवाण होत होती. यातूनच आण्णाभाऊंचे वैश्विक पातळीवरील मानवी मुक्तीचा जयघोष करणारे पोवाडेही निर्माण झाले. अण्णाभाऊंचे संवेदनशील मन, प्रतिभासंपन्न आणि प्रगल्भ बुध्दीमतेतून अण्णाभाऊ साठे यांच्यात वैचारिक पोक्तपणा निर्माण होऊ लागला. अण्णा भाऊंचे वडील भाऊराव साठे हे १९३८ यावर्षी दिवंगत झाले. स्मृतीशेष भाऊराव साठे यांच्या निर्वाणानंतर अण्णाभाऊ साठे काही दिवसांसाठी

वाटेगावला होते. त्याच कालखंडात सांगली- सातारा अर्थात पश्चिम महाराष्ट्राच्या परिसरात क्रांतीसिंह नाना पाटलांच्या पत्री सरकारने मानव मुक्ती साठी इंग्रजांच्या विरोधात स्वातंत्र्याची लढाई निर्माण केली होती नव्हे तर ती निर्माण झाली होती. त्या क्रांती आंदोलनात अण्णाभाऊ साठे हें क्रांतीसिंह नाना पाटलांच्या मानवमुक्तीच्या लढाईसाठी भूमिगतपणे काम करत होते. अशा अनेक शोषण मुक्तीच्या, विचारधारेच्या मुशीत अण्णाभाऊंची वैचारिक जडण-घडण अधिक चौरस होत होती. त्याही पुढे जाता, मुंबई आणि देशांतर्गत विविध परिवर्तनाच्या चळवळी, स्वातंत्र्यसंग्रामाची लढाई आणि जागतिक दुसरे महायुद्ध अशा अनेक देश आणि जागतिक पातळीवरील सर्व चळवळींनी अण्णाभाऊंना अधिक बोलके, लिहिते आणि व्यवस्था परिवर्तनातील चिंतनशिल नि निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून कार्यप्रवण केले.

अण्णाभाऊ साठे यांच्या चिकित्सक, डोळस, स्वयंपूर्ण व्यक्तिमत्वासमवेत आणि त्यांच्यात उपजत असणारी स्वतंत्र प्रज्ञा आणि प्रतिभेला त्या मुंबईतील विविध वैचारिक चळवळीने अधिक सक्षम बनविले. त्यातूनच ते जागतिक पातळीवरील वैश्विक मानवाचा कळवळा मांडणारे सत्यशोधकी साहित्यिक आणि विचारवंत म्हणूनच उदयास आले. सामान्य, उपेक्षित, अस्पृश्य कामगार, शेतकरी, भटक्या आणि वंचितांच्या युगांचे साक्षीदार होऊन या सर्व वैश्विक मानव समूहाचे दुःख - दारिद्र्य त्यांची हिंमत, जिद्द, संघर्ष, बंड हे अण्णाभाऊंनी लक्षवेधी भूमिकेतून मांडले. निखळ माणूस म्हणून रोजच्याच रोटीसाठीचा संघर्ष आणि लढा सोबतीला ज्ञानाची - विज्ञानाची प्रेरणा घेऊन आणि देवून सर्वांगाने व्यापलेल्या जीवन संघर्षाच्या जगात धडपडणाऱ्या संघर्षशील माणसांचा साक्षात्कार आणि सत्कार अण्णाभाऊंनी केला. परिणामी अण्णाभाऊ हे लोक लेखक म्हणून मुंबईतच उदयास आले. जगद्विख्यात झाले. मानवी जीवन उन्नत व्हावे या जाणिवेतून अण्णाभाऊंनी समाज लेखन केले. त्यांच्या कथा ऐतिहासिक आणि वैश्विक ठरल्या. अण्णाभाऊंनी एकूण २०० च्या आसपास कथा लिहिल्या आणि त्या १४ कथासंग्रहात मांडल्या मग ते बरबाद्या कंजारी असो, चिराग नगरीची भूतं,

निखारा, पिसाळलेला माणूस, अबी, फरारी, भानामती, लाडी, कृष्णाकाठच्या कथा, खुळंवाडी, गुराळ आणि गजाआड असे अनेक कथा संग्रह भारतीय आणि विदेशी भाषेत प्रकाशित झाले. १९९७ साली गजाआड या कथासंग्रहाची पाचवी आवृत्ती सुरेश एजन्सी पुणे, यांनी प्रकाशित केली. गजाआडच्या कथासंग्रहात एकूण अकरा मोजक्या कथा असल्या तरीही त्यातील सुलतान, भोमक्या, मला एक बॉम्ब द्या आणि इतर या सर्व कथातील नायक अण्णाभाऊंना गजाआड अर्थात तुरुंगात भेटलेले आहेत.

नागपूर पासून ते आमरावती पर्यंत पोटाच्या भाकरीसाठी भंटकती करणारा भोमक्या तंरूग भोगतो. न केलेल्या गुन्ह्यात कैदी होतो. ही आन्यायी भारतीय समाजरचनाच मुळातच मुठभरासाठीच आहे. कपडे नसलेल्या, भाकरी नसलेल्या, घर, शिक्षण, आरोग्य, इतकेच नव्हेतर भारतीय जमिनीवर त्यांचा कसालाच हिस्सा नसलेल्या उपेक्षित जगाचे भयंकर वास्तवाचे निरीक्षण आणि आकलन केले असता मानवी समुहाला मूलभूत गरजा मिळाल्याच पाहिजे. असा अग्रह धरणा-या आणि मानवी जाणीवा निर्माण करणा-या भोमक्याच्या माध्यमातून आण्णाभाऊने सहानुभूतिने मांडल्या. अण्णाभाऊ या जगद्विख्यात साहित्यिकांच्या निखळ मानवतावादी कथासंग्रहातील भोमक्या या कथेची भूमिका मानवी मनाला अंर्तमुख करणारी आहे. भोमक्या हा अमरावती जेल मध्ये अण्णाभाऊंच्या शेजारी झोपला होता. मानवी जीवन मूल्य मांडणारी, भोमक्याच्या जीवनाची कारुण्यकथा हृदयाला भिडणारी तरच आहेच आणि मनही हेलावून सोडणारी आहे.

देश आणि समाज वृत्ती - प्रवृत्तीच्या जाती - धर्माच्या आणि संस्कृतीच्या माणसाने बनलेला असतो. खरे तर देश माणसांचा आसतो, देश हा दगड - धोंडयानी बनलेला नसतो, देव - देवतांच्या - थोंतांडानीही बनलेला नसतो. देश फक्त झाडा झुडपांचाही नसतो. देश जीवंत माणसांचाच असतो. तोच देश जगला जातो नि जागविला पण जातो. मेलेल्या माणसांचा देश नसतोच. ते स्मशान असते. समाजात माणसे जिवंत असणे म्हणजे समाज नि देश या शब्दाला सजीवपणाचा खरा अर्थ प्राप्त होत असतो. अशा देशातील

संवेदनहिन समाजात जगण्यासाठी धडपडणा-या मानवी संस्कृतीचे चित्रण अण्णाभाऊंनी भोमक्या या कथेतून विस्ताराने मांडलेले आहे. माणसे जगत असताना त्यांना माणूस म्हणून जगण्यासाठीही संघर्षमय मार्गाचा अवलंब करूनचं जगावे लागते. किंबहुना निसर्गाने निर्माण केलेल्या मुलभूत अवश्यक गरजांच्या आणि पोटाच्या भूकेसाठीच माणसे संघर्षमय जीवन जगत असतात. माणसांच्या जगण्यातील अंतर - भिन्नस्तरीय आहे. ती जात, धर्म, पंथ आणि देश निहाय विलक्षणही आहे. हे अण्णाभाऊंच्या भोमक्या या कथेतून पाहायला मिळते.

अण्णाभाऊंचा भोमक्या खरा तर साधा - सरळ माणुस. नियतीने त्याच्याशी युद्ध खेळले आणि बेढब, ओबड-धोबड देह दिला. हाचं भोमक्याच्या जीवनातला आणि जगण्यातला गुन्हा ठरला. हा गुन्हा सोबत घेऊनच भोमक्या पोटासाठी भिक मागून जगत होता म्हणून त्याचे जगणे हे जगानिराळे होते. भोमक्या हा भारतीय संस्कृतीचा वारसा सांगणारा, माणसांचे स्वप्न पाहणारा, माणसासारखे जगण्याची उर्मी घेऊन हाताला काम मिळवण्याच्या प्रयत्नात सामावलेला साधा आणि इमानदार माणूस. जो की इतर माणसासारखे जीवन जगण्यासाठी भोमक्याही धडपडत होता. दारोदारी कामाची याचना करत होता. कोणी काम देत नाही म्हणून तो भाकरीसाठी अक्रोश करण्या-या आतडयाची नैसर्गिक भूक शमविण्यासाठी नाइलाजाने भोमक्याला भिक मागणे भाग पडले. जणू भाकर मिळाली की, माणसांना त्याचे सर्वचं हक्क प्राप्त होत असतात. जणू तो देश आणि तो समाजही खऱ्या अर्थाने स्वतंत्र होत असतो. म्हणूनच की काय? मराठी साहित्यातील चिंतनशील लेखकाने जगण्यासाठीचं भाकरीचा चंद्रमा शोधला. त्याच स्वातंत्र्याचा भुकेला भोमक्या भुकेची आग शमविण्यासाठी कामाची भीक मागत दारोदार हिंडत होता पण त्याच्या ओबड-धोबड शरीरसृष्टीकडे पाहून भोमक्याला कुठेच आणि कोणीच काम देत नव्हते. ही भयानक आणि विदारक सामाजिक वास्तवता अण्णाभाऊंनी आपल्या संवेदनशील मनाने पाहिली, समजावून घेतली आणि भोमक्याचे जगावेगळे वास्तव जगणे जगासमोर मांडले. जणू विद्रूप शरीर घेऊन

जन्म घेणे, धन - संपती विना जन्म - घेणे, बहिष्कृत आणि विस्थापीत असणे म्हणजे पापच. या पापाचा वाटेकरी "भोमक्या" हाताच्या सामर्थ्याला काम मिळावं, घामातून दाम निर्माण करून पोटाची खळगी भरावी. इतर माणसां सारखाचं आपणही संसार करावा. याच आशा अपेक्षेत गुंतलेला भोमक्या. या भोमक्याला संस्कृतीच्या वारसदारांनी काम दिले नाही म्हणून भीक मागणे भाग पडले. हे त्याच्या पोटाने ठरवून दिले परिणामी पोटासाठी भोमक्या भिकारी झाला म्हणूनचं अण्णा भाऊ म्हणतात, पोट भूक निर्माण करते, अन्नाची भूक भीक निर्माण करते... तद्वतच भोमक्या अनेक भिकाऱ्यांच्या गर्दीत एक भिकारी म्हणून भोमक्याने वाढ केली.

भीक मागत जगत असताना पोटाचा व्यवहार नियमितपणे दिवस-रात्र चालू असायचा. भोमक्याला भिकेच्या मोबदल्यात कधी कपडे मिळायचे तर कधी दिवसभराची भाकरी. दिवसभराची भिक जणू संपत्ती आणि भिकारीपण जणू ऐश्वर्य आणि राजेशाही याच थाटात भोमक्या दररोज भीक मागत होता. कपड्याच्या रूपात मिळालेली भीक आनंदाने अंगावर घ्यावी तर दुसऱ्या दिवशी उपाशी मरावे लागेल कारण कपडेपणामुळे माणसाला माणसाचे माणूसपण मिळते. नागडेपणातील उघडेपणा हे कपडेपणात आल्याने माणूस सुसंस्कृत दिसायला लागतो आणि मग तो भीक मागण्यास लायक ठरत नाही. दोन-दोन दिवसांचे शिळे अन्न भीक म्हणून देणारा समाज भिकेच्या स्वरूपात मिळालेले कपडे अंगावर घातलेल्या भोमक्याला म्हणतो. तू तर दिसायला तगडा आणि अगडबंब आहेस, तुला भिक मागायला काय झाले? काम करून जग. खरे तर, भोमक्याला कामच कोणी देत नव्हते हेचं तर भोमक्याचे दुःख होते तेच समाजाच्या लक्षात येत नव्हते म्हणून तर भीक मागून जगावं लागत होते. हेच भोमक्याच्या संदर्भाने घडले.

भिकाऱ्यांना भाकरीसाठी अंगावरची कपडे काढावी लागतात तरच भीक मिळते. तद्वतच भोमक्यालाही पोटासाठी अंगावरची कपडे काढावी लागली. भीक पाहिजे तर कपडे नको. कपडे हवे तर भीक नाही, भाकर नाही. सामान्य माणासांचे दारूनपण आणि विखूरलेले जीवन भोमक्या या कथेच्या

माध्यमातून भूके कंगाल मानवी समूहाच्या  जगाचे मर्म अण्णाभाऊंनी वेदनात्मक बांधले आहे. भोमक्याच्या जीवनातील दारुण अवस्था निर्माण करणारे कोण? तुम्ही आम्हीच. वेगवेगळ्या कारणातून अनेक भोमके निर्माण करणारे कोण? तुम्ही आम्हीच आणि आपली आदर्श संस्कृती. जिने माणसांच्या भाकरीचा अधिकार हिसकावला.  इतकेच नव्हे तर शरीराचा निसर्ग झाकण्यासाठी कपडेही घालू दिले नाही. (नाकारले)  हे अनेक भिकाऱ्यांच्या बाबतीतच नव्हे  तर सर्वसामान्य, उपेक्षित आणि आदिवासी यांच्या जीवनातील दुःख भोमक्याच्या संदर्भाने अण्णाभाऊंनी आस्थेने मांडून रक्तामासाच्या माणसांना या  विषमतावादी संस्कृतीने  नागडं करून जगायला लावले. ही अमानवी विषारी भारतीय संस्कृती (प्रवृती)  समाजासमोर उजागर केली. हे समजुन घेतले पाहिजे. भिकारी भोमक्याला तुरुंगात पाठवणारे, भिकाऱ्याची तुरुंगा इतकी किंमतही करणारे आणि भारतीय संस्कृतीचा जप करणारे तुम्ही - आम्हीच.

दररोज दारावर येणाऱ्या भिकाऱ्याला भीक द्यायची आणि भिकेच्या आशेने  रोज येणाऱ्या भिकाऱ्याला  चोर समजून लाथा घालून त्याला तुरुंगवास द्यायचा हे अन्यायाच. असे अनेक प्रसंग दिवसाला साक्षी ठेवून  रोजचं या पृथ्वीतलावर घडत असतात. भोमक्याच्या बाबतीत अगदी हेच घडले. रोज चांगली भीक देणाराच्या घरापासून भोमक्या आपल्या रोजच्या भिकेची सुरुवात करीत असे, असे अनेक दिवस झाले. रोजच भीक देणारा श्रीमंत, धनदांडगा भोमक्याला सहानुभूतीने भीक द्यायचा. अचानकपणे त्या धनदांडग्यांच्या घरी चोरी झाली. तेथेच भोमक्याच्या जीवनात तुरुंगवास निर्माण झाला. त्या धनदांडग्या माणसाने कुठलाच विचार  किंबहुना  शहानिशा न करता  चोरीचा आरोप भोमक्यावर घातला परिणामी भिकारी भोमक्याला न केलेल्या चोरीच्या आरोपाखाली तुरुंगवास भोगावा लागला.अमरावती मध्यवर्ती तुरुंगात अण्णाभाऊंची आणि भोमक्याची भेट झाली. स्वतःच्या जीवनातील कटू सत्य, कहाणी भोमक्यानेच अण्णाभाऊंच्या पदरी टाकली. त्याच भोमक्याचे  वास्तव चित्रण अण्णाभाऊंनी जीवनवादी भूमिकेतून जगाच्या वेशीवर टांगले. भोमक्या

हा एक माणूस या नात्याने समाजातील  महत्त्वाचा घटक असतानासुद्धा समाजाने माणूस म्हणून भोमक्याला वागविले, जगविले, नाहीचं तर उलट भोमक्याला  दुःखच दिले. ते दुःख पचवित भोमक्या जगत होता. तुरुंगवासही भोगत होता

दुःखाला सीमा नसतात तसेच प्रेमाला सुद्धा. सम दुःखाच्या वाटेने मार्गक्रमण करणारी भोमक्याच्या दुःखाशी समरस होणारी आंधळी भिकारी "सुंर्दी" आणि भोमक्या यांच्यात नातेसंबंध निर्माण होतात परिणामी भोमक्याच्या भिकेतील  मिळणाऱ्या भाकरीत सुंर्दी वाटेकरी होते.  शरीराच्या गरजा ह्या  निसर्गदत्त असतात तशाच भाकरीच्याही आणि इतरही. तहान, भूक असो की, शरीरसुख असो, हे निसर्गाने  घालून दिलेले तत्त्व - नियम नकळत भोंमक्य आणि सुंर्दीच्या  अंगवळणी पडले.  त्यातून पती- पत्नी आणि  मुलाचा भिकारी बाप भोमक्या  तुरुंगवास भोगतो. भोमक्याच्या जीवनाशी खेळला गेलेला विषमतावादी संस्कृतीचा खेळ आणि त्यांचं संस्कृतीच्या  वारसदाराने भोमक्याला काम दिले नाही. सामान्य माणसाप्रमाणेच जगू दिले नाहीच. काम करून, कष्ट उपसून, घामावर जगू इच्छिणाऱ्या भोमक्याचे स्वप्न भंग केले,म्हणून अण्णाभाऊ म्हणतात, “या भांडवली जगाकडून न्यायाची अपेक्षा मी मुळीच करत नव्हतो.  मला त्याचा अनुभव आला होता. तू कोण? तुझे खरे नाव काय? जात कोणती? तू नेमक्या कुठल्या संस्कृतीचे गोंडस नाव?  हा कुठल्या संस्कृतीचा वारसदार?” अशा अनेक प्रश्नांच्या गर्दीत नेऊन टाकणारे, हृदयाचा ठाव घेणारे आणि वेदनामय करणारे असे अनेक प्रश्न अण्णाभाऊंना पडतात.

भोमक्या आणि या जगात भोमक्या सारखे जगणारे आणि पोटासाठी संघर्ष करणारे, धडपडणारे लाखो लाचार माणसे  या जगात आहेत. कदाचित ते भिकारी नसतील अशा लाखो माणसांच्या  जगण्याची धडपड आणि भाकरीसाठीची लढाई अद्याप आजही थांबलेली नाही. भाकरीसाठी लढणाऱ्या सामान्य माणसांचा हा प्रश्न अण्णाभाउंनी जगासमोर मांडला. सामान्य माणसांच्या घामाची  - रक्ताची  किंमत या  जगात शून्य होती की काय? असा सवाल प्रस्थापित जगासमोर उपस्थित केला. अशा अनेक भूकेकंगाल

भिकाऱ्यांच्या जीवनातले विदारक जीवनचक्र अण्णाभाऊनी सहानुभूतीने साहित्याच्या माध्यमातून जगाच्या वेशीवर समर्थपणे आणि यशस्वीपणे टांगले, सामान्य, हिन, दिन आणि उपेक्षित माणसांबद्दल माणसाने माणसासारखाचं विचार करावा असे या जगाला आवाहानही केले. मानवतावादी दष्टीने मानवी जीवनाचे चिंतन वाहणा-या वास्तववादी आणि विज्ञानवादी पिंडाच्या अण्णाभाऊंनी हा उपेक्षित भोमक्या जसाच्या - तसा जगासमोर मांडला आणि भारतीय संस्कृतीचे भोंगळे दर्शन भोमक्या या वास्तव कथेच्या माध्यमातून समाजासमोर ठेवले.

खरे तर मानवी जगतात माणसांच्या रक्ताची किंमत शून्य होऊ नये तर माणूस म्हणून माणसाच्या माणूसकीची उंची अधिक वाढली पाहिजे. जेथे देवसुध्दा खुजा झाला पाहिजे. तो माणूस सन्मानपूर्वक जगला पाहिजे, माणूस म्हणून त्याचे स्वातंत्र्य त्याची इच्छा आकांक्षा आणि त्यांचे मूलभूत हक्क सन्मानपुर्वक प्रदान केले पाहिजे. हे अण्णाभाऊंनी अधोरेखित केले. अण्णाभाऊचं म्हणतात, 'पोट हि भूक निर्माण करते. अन्नाची भूक हे भीक निर्माण करते. अन्नाच्या भुकेला विचारांची जोड लागल्यास विषमतेचे साम्राज्य धुळीस मिसळते". भुक व भूकेच्या आगीतून निर्माण होणारे तत्वज्ञान भाकरीच्या संदर्भाने निर्माण होते. ती भूकेची आग पेटते आणि इतरांनाही पेटवित जाते. म्हणून अन्नाच्या भूकेला विचारांची जोड लागल्यास विषमेतेचे साम्राज्य धुळीस मिसळते. हे वास्तव नाकारून चालणार नाही. या जगात माणसे जगण्यासाठी अन्न खात असतात, तर आजच्या जगात गर्भश्रीमंत फक्त खाण्यासाठीचं जगतात. फक्त खाण्यासाठी जगणारे माणसे ते भोगवादी आणि चंगळवादी असतात. त्या संस्कृतीचा भोमक्या नव्हता तर शरीराला आवश्यक असणा-या उर्जेसाठी जगणाऱ्या माणसाचा तो प्रतिनिधी होता. त्याची माफक अपेक्षा होती मला इतर माणसासारखे जगायला मिळाले पाहिजे. इतरांसारखाच संसार करायचा आहे पण जातीय आणि वर्गीय संस्कृतीने भोमक्याला तसे जगू दिले नाही म्हणून या विषमतामूलक संस्कृतीला अण्णाभाऊनी एक प्रश्न विचारला, ते भोमक्याच्या संदर्भाने, अमरावती मध्यवर्ती कारागृहातील ज्या

खोलीत भारताचे माजी गर्व्हनर जनरल चक्रवृती रागोपालाचारी एके काळी शांतचित्ताने भारतीय उन्ननितीचे व पूरातन संस्कृतीचे ग्रंथ वाचत होते. त्याच खोलीत भारतीय संस्कृतीचा वारसदार भोमक्या निच-पिच पडला होता. म्हणून अण्णाभाऊ म्हणाले, भोमक्या कोण? त्याचे समाजात स्थान काय? मराठी भाषेत भोमक्या या नावाचा अर्थ काय? भोमक्या कुठल्या भाषेतील नाव आहे? भोमक्या हें नाव कशापासून उत्पन्न झाले? आणि अण्णाभाऊच उत्तरही देतात, भारतीय संस्कृतीचा टेंभा मिरवणाऱ्याच्या डोक्यात भारतीय गुलामगिरीने आणि दारिद्र्याने घातलेला धोंडा म्हणजे भोमक्या.

भोमक्याला काम पाहिजे होते. तो कष्ट करून जगणार होता. कष्ट करणारे जनसामान्य बहुजन हे देशाच्या मालमतेचे रक्षण करणारे आहेत. देश घडविणारे आहेत. देशाची समृद्धी, ऐश्वर्य वाढविणारे, देश अधिक सुंदर नि समृद्ध करणारे आहेत. कष्ट करणारा सामान्य मानवी समूह म्हणून देशाची जडण - घडण करणारे आहेत. सामान्य माणसाच्या कष्टाला त्यांच्या त्याग – सर्मपणाला आणि घामाला नाकारून किंवा वगळून देशाची आर्थिक प्रगती मोजता येणार नाही. हे आण्णाभाऊने जगाला आणि जगाच्या अर्थ व्यवस्थेला सांगितले. या अन्वयार्थाने, भोमक्या ही कथा भाकरीचे तत्वज्ञान मांडणारी कथा आहे.

भाकरीसाठी आक्रोश मांडणाऱ्या हजारो-लाखो भुकेकंगालाच्या रिकाम्या आतड्याची आर्त किंकाळी ही दुःखी उपेक्षित माणसाच्या दु:खाशी समरस झालेल्या अण्णाभाऊंच्या रिकाम्या आतड्याशी ठाव घेत होती. कधीही, कोठेही कष्ट करण्याची तयार असणारा भोमक्या अण्णाभाऊला पाटील म्हणत असे कारण अण्णाभाऊ हे माणसांच्या भावना जपणारे नि जोपासणारे दृष्टे होते. दुःखाचा डोंगर पदरी बाळगून माणसासाठीच जगणाऱ्या अण्णाभाऊने माणूस म्हणून घामावर जगणा-या माणसाचे आत्मिकतेने चिंतन केले त्यामुळेच अण्णाभाऊंचा भोमक्या वैश्विक पातळीवरील भुकेल्या माणसांचे वास्तव प्रतिनिधित्व करतो म्हणून भोमक्या हे भाकरीचे तत्वज्ञान वाटते.

सुलतान - भीमा - भोमक्या यांचा भाकरीसाठीचा लढा हा वैयक्तिक नव्हताच तर जगण्याचे अनेक सामाजिक संदर्भ घेऊन तो निर्माण झाला होता. तो शोषितांचा आवाज आहे आणि चिंतनही आहे. वर्ण - वर्ग विरहित सामाजिक ऐक्याची जडणघडण ही नैसर्गिक स्वातंत्र्याच्या निर्माणाची पहाट असते, त्यातूनच छोट्या - छोट्या वंचित समाज घटकांना अर्थात बहिष्कृत समाज घटकांना दाष्यमुक्ती मिळते आणि शोषणमुक्त समाज संस्कृती निर्माण होते. तोच ध्यास अण्णाभाऊंनी आणि अण्णाभाऊंच्या साहित्याने घेतला होता. ज्या समाज व्यवस्थेने निसर्गाने घालून दिलेले विचार - व्यवहार नि तत्त्व, विवेकी मानवी समाज, नीतिमत्ता जोपासणारी मानवी संस्कृती जेव्हा हातात हात घेऊन जगते त्यातूनच निकोप मानवी संस्कृती निर्माण होत असते. त्यासाठीच अण्णाभाऊंनी आयुष्यभर सामाजिक जाणिवेने बहिष्कृतांचा मानवी कळवळा जपलेला आहे.

सुलतान - भीमा - भोमक्या ज्या समाजकृतीतून निर्माण झालेले आहेत तेचं विचारतात, संस्कृती म्हणजे नेमके काय? संस्कृतीची परिभाषा काय? श्रेष्ठ जीवन जगण्याचे निकष किंवा परिमाण कोणते? हे प्रश्न घेऊनच सुलतान- भीमा - भोमक्या सुसंस्कृत संस्कृतीच्या छाताडावर उभे आहेत.

भाकरीसाठी जीवघेणी धडपड करणाऱ्या मानवी समूहाला वगळून किंवा नाकारून स्वतंत्र सुसंस्कृतीची मांडणी करता येणार नाही तर शोषितांच्या अंतरंगात खोल आत मध्ये जाऊन त्यांचे जीवन आणि त्यांचे जगणे मानवी जाणिवेतूनचं शोधावे लागणार आहे. शोषितांच्या जीवनमूल्यांचा एकेरी पैलूंनी नव्हे तर अनेक अंगानी ध्यास घेऊन संशोधन करावे लागणार आहे. तरच खऱ्या अर्थाने उपेक्षित मानवी समूहाचा जगण्याचा शोध लागू शकतो. ते जगणे मानवी मूल्यवर्धित आहे की मूल्यहीन? याची शहानिशा सुलतान - भीमा - भोमक्याच्या जगण्याचे मूल्यमापन संशोधकांनी करण्याची गरज आहे. हीच अपेक्षा सुलतान - भीमा - भोमक्याच्या संदर्भाने गैर ठरणार नाही असे वाटते.

खरे तर, सुलतान - भीमा - भोमक्या हे पारंपारिक आणि न्यायाची चाड नसलेल्या समाजव्यवस्थेने निर्माण केलेले, भाकरीसाठी आक्रोश करणाऱ्या रिकाम्या आतड्याच्या समाजाचे सामाजिक दस्ताऐवज आहेत. म्हणूनच या संदर्भाने भाकर ही मानवाचे जीवन आहे. माणसांच्या जगण्या-मरण्यामध्ये असणारे पोट त्या पोटासाठी लागणारी भाकर त्यासाठी खाव्या लागणाऱ्या खस्ता आणि त्यातून निर्माण होणाऱ्या वेदना आणि दुःख, सुलतान – भीमा - भोमक्याच्या माध्यमातून जग जाहीर होतात.

महात्मा गौतम बुद्धाने माणसांच्या दुःखाचा शोध घेतला, कार्ल मार्क्सने मानवी समुहाच्या दुःखाच्या संदर्भाने पिळवणूक हा शब्द वापरला, पिळवणूकीतुनचं दुःख निर्माण होते हे सिद्ध केले. दुःखाच्या निर्मितीच्या अनुषंगाने विचार करता भाकरीसाठी सुलतान - भीमा - भोमक्याच्या हाताना काम मिळाले असते तर? त्यांची भाकरीसाठी छळवणूक झाली नसती परिणामी पोटाच्या भुकेनी सुलतान - भीमा व भोमक्याची पिळवणूक केली म्हणून अण्णाभाऊ साठे म्हणतात, “माणसांच्या दुःखाचा शोध घ्यायचा असेल तर पहिल्यांदा माणसांचा शोध घ्यावा लागतो, तरच माणसांच्या दुःखाचा शोध घेता येतो.” हे तत्वज्ञान सुलतान -भीमा - भोमक्याच्या अनव्याअर्थाने निर्माण झाले असले तरीही, हजारो - लाखो दरिद्री आणि भुक्या संसाराच्या समाजिक स्तराच्या दुःखाचा हा शोध नि सिद्धांत आहे.

❖ **संदर्भ**


- **माझा रशियाचा प्रवास -** अण्णाभाऊ साठे
- **सुलतान – कथा,** (गजाआड), अण्णाभाऊ साठे
- **स्मशानातील सोनं - कथा, (**बरबाद्या कंजारी), अण्णाभाऊ साठे
- **भोमक्या – कथा,** (गजाआड), अण्णाभाऊ साठे
- **मुंबईची लावणी -** अण्णाभाऊ साठे